# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## दिनांक २०-०२-२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक २० फेब्रुवारी २०१६ रोजी (का.प.क्र.१४) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.सुनिल केंद्रेकर, आयएएस नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

(यावेळी वंदेमातरम गीत बरोबर झाले नाही. आवाज येत नव्हता.)

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहॉंगीर मुलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
८. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
९. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
१०. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
११. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
१२. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१३. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१४. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१९. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२०. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२१. स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
२२. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२३. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२४. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२५. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२६. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२७. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२८. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

२९. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
३०. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत
३१. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
३२. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३३. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३४. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३५. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३६. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३७. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३८. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
३९. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४०. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४१. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४२. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४३. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४४. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४५. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
४६. स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
४७. स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ
४८. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
४९. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५०. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५१. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५२. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५३. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५४. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५५. स.स. श्री.शेख जफर अखतर
५६. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
५७. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
५८. स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
५९. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६०. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६१. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६२. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६३. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६४. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६५. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
६६. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
६७. स.स. श्रीमती बनकर विजया संजय

६८. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
६९. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७०. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७१. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७२. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७३. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७४. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७५. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
७६. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
७७. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
७८. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
७९. स.स. श्री.सोहेल शकील शेख
८०. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८१. स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन
८२. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८३. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८४. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८५. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८६. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
८७. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
८८. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
८९. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९०. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९१. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९२. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९३. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९४. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९५. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
९६. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
९७. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
९८. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
९९. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे</u>**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

मा.महापौर :सभागृहातील माईकची व्यवस्था चांगली करावी. मागे खाजगी व्यक्ती ला माईक सिस्टमचे काम दिले होते. त्यांचे पेमेन्ट दिले नाही. काम व्यवस्थीत होत नाही का? का कार्यवाही होत नाही.

मा.आयुक्त :शहर अभियंता यांनी यात लक्ष देऊन कार्यवाही करावी.

श्री.नासेर सिद्यीकी :आकाश जाधव या मुलाचा ड्रेनेज लाईनचे काम चालू असतांना पाण्यात पडून मृत्यू झाला. श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :यास अनुमोदन आहे.

श्रीमती माधुरी देशमुख :सियाचीन मध्ये जे जवान मृत्यूमुखी पडले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

(या वेळी आकाश बाळकृष्ण जाधव व सियाचीन मध्ये मृत्यू झालेल्या वीर जवानांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर :आकाश जाधव यांचा महापालिकेच्या लाईनचे काम चालू असतांना मृत्यू झाला त्यामूळे त्यांचे कुटूंबीयास महापालिकेतर्फे जी आर्थीक मदत देता येईल ती द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा झाल्या त्याचा निषेध करण्यात यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :जी सुचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे. निषेध करावा.

श्रीमती माधुरी देशमुख :श्रीमती विजया रहाटकर यांची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबध्दल अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :अनुदमोदन आहे.

श्रीमती मनीषा मुंढे :केंद्र शासनाच्या विविध विकासाच्या योजना आल्या परंतु माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही.

मा.महापौर :सौ.रहाटकर विजया यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी महापौर असतांना चांगले काम केलेले आहे. सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येते. तसेच त्यांचे कुटूंबीयांना पत्राने कळविण्यात यावे. पाकिस्तान संदर्भातला विषय होता त्याबाबतीत घोषणा बाजी झाली त्यास समर्थन करणार नाही.

श्री.शिवाजी दांडगे :महापालिकेच्या प्रियदर्शनी कॉलनी इंदिरानगर शाळेला आयएसओ दर्जा मिळाला त्याबद्दल तेथील सर्व शिक्षक कर्मचारी तसेच मा.आयुक्त यांचे अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांचे अभिनंदन करावे तसेच शिक्षण विभागाचे प्रमुख उपआयुक्त (प्र.) श्री.रविंद्र निकम यांनीही यासाठी मेहनत घेतली शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी चांगले प्रयत्न करतात त्यांचेही अभिनंदन करावे.

मा.महापौर :महापालिकेच्या शाळेत अनेक गोरगरीबाची मुले शिक्षण घेत असतात. सर्व शिक्षक अधिकारी व समितीचे सभापती यांचे प्रयत्नामुळे इंदिरानगर प्रियदर्शनी कॉलनी या शाळेला आयएसओ दर्जा मिळाला शालेय विद्यार्थ्यांसाठी आणखी काय योजना राबविता येईल शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करावे मा.आयुक्त,उपआयुक्त (प्र.) श्री रविंद्र

निकम व सर्व शाळेचे शिक्षक तसेच मा.सभापती शिक्षण समिती यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.

(महानगरपालिकेत मुख्य लेखा परीक्षक या पदावर रूजू झालेल्या श्रीमती दि.मा.देवतराज यांनी त्यांचा परीचय करून दिला.)

श्री.अब्दुल नाईकवाडी :विषय पत्रिका स्पायरल बॉयडींग करून दयावी.

मा.महापौर :नगरसचिव यांनी याची दखल घ्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :शिवजयंती निमित्त क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाच्या ठिकाणी साफसफाई व विद्युत रोषणाई वेळीच करण्यात आली नव्हती.वृत्तपत्रातही बातम्या आल्या यास कोण जबाबदार आहे

श्रीमती ज्योती मोरे :शिवजयंती निमीत्त सर्वच ठिकाणी विद्युत रोषणाई करणे आवश्यक होते तशी कार्यवाही केली नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :विद्युत रोषणाई केली नाही ज्याची चुक असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.रामेश्वर भादवे :क्रांतीचौक येथील शिवाजी महाराज यांचे पुतळयाच्या ठिकाणी लाईटींग बंद होती जे अधिकारी दोषी असेल कार्यवाही करावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :१९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती साजरी केली जाते राज्य शासनाने या दिवशी सार्वजनिक सुटटी जाहीर केलेली असते हे सर्व माहित असतांना हेतूपुरस्कर क्रांतीचौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाच्या ठिकाणी विद्युत रोषणाई केली नाही. या बाबतीत जे अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :२६ मार्च रोजी तिथी नुसार शिवजयंती साजरी होणार आहे या दिवशी सुध्दा शिवाजी महाराज यांचे पुतळयाच्या ठिकाणी विद्युत रोषणाई करण्याचे आदेशीत करावे.

कार्य.अभियंता(अ,क,ड) :या संदर्भात उपअभियंता यांना दोन दिवसापुर्वी सांगितलेले होते. परंतु काही तांत्रिक कारणामुळे उशीरा लाईटची व्यवस्था झाली. यात प्रशासनाकडून चुक झाली माफी मागतो.

श्री.रामेश्वर भादवे :संबधीतावर कार्यवाही करावी यात दुर्लक्ष केलेले आहे.तोपर्यत सभागृह चालवू देणार नाही.

श्री.इरशाद खान :सभा तहकूब करू नये.

(या वेळी स.सदस्य मोठमोठयाने बोलत असतात)

श्री.अफसर खान :आम्ही सर्व शिवाजी महाराज यांचा आदर करतो. योग्य ते कार्यवाहीचे आदेशीत करावे. सभा तहकूब करू नये.

मा.महापौर :काल परीस्थिती वेगळी निर्माण झाली होती. मी स्वतः मा.सभापती मा.उपमहापौर यांनी संबधीत अधिकारी यांना जयंतीच्या तीन दिवस आधी तयारी करावी असे सांगून सुध्दा तशी तयारी केली नाही. वेळीच तेथे विद्युत रोषणाई साफसफाई केली असती तर कालची जी परीस्थिती निर्माण झाली ती झाली नसती. सुचना केल्यानंतर गांभीर्याने घेतले नाही एक दुस-याकडे बोट दाखवत राहिले. कोणत्याही महापुरूषाची जयंती पुण्यतिथी असेल अशा वेळी संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही करायला

पाहिजे. अधिकारी सांगतात कुणी काम करण्यास येत नाही. हे बरोबर नाही. आम्ही स्वत: सर्व जण सकाळी पोहचलो तेथील ५००-१००० कार्यकर्ते होते. त्यांना शांत केले. विनंती केली की, जे झाले प्रशासनाची चुक झाली. प्रशासनाला पत्र ही दिले की, यापुढे असे होऊ नये. तसेच मा.आयुक्त यांनी म्हटले की जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेश दिले. पुढील कार्यवाही काय झाली?

मा.आयुक्त :वाईट वाटते की अधिकारी यांचे चुकीमूळे एवढया मोठया व्यक्तीच्या विषयावर चर्चा सुरू आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे राजे होते. त्यांचे महत्व आपण बोलल्यामूळे वाढणार नाही त्यांचे महत्व फार मोठे आहे बोलतांना खेद होतो की, एवढया छोटया व्यवस्थेकडे दुर्लक्ष संबधीत अधिकारी त्यांनी निष्काळजी केल्यामूळे हा चुकीचा प्रसंग ओढावला. एवढा मोठा चांगला दिवस व मोठया व्यक्तीच्या संदर्भात अनावश्यक चर्चा सुरू होते. स.पदाधिकारी अधिकारी येतील जातील परंतु महापालिकेचे नाव खराब होते यांचे वाईट वाटते.या प्रकरणी जे संबधीत आहे सर्वांना कारणे दाखवा नोटीस दिल्या ॲक्शन होणार खुलासा येईल. निलंबन करण्यासारखी परीस्थिती असेल तर ते सुध्दा केले जाईल. शहर अभियंता,श्री.कोल्हे,श्री. निकम व त्यांचे सहकारी यांनी निष्काळजीपणा केलेला आहे.कार्यवाही होईलच जो प्रसंग ओढावला त्या बाबतीत वेळीच मला कल्पना मिळाली नाही वेळीच कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असते. यापूढे ही सर्व जबाबदारी उपआयुक्त प्रशासन यांचेकडे दिली काल जे त्या लोकांना बोललो प्रशासक प्रमुख मी आहे त्यांना स्वारी बोललो आपल्या समोरही स्वारी बोलतो.

मा.महापौर :सभागृहात माईक सिस्टम खराब होती म्हणून खाजगी व्यक्तीला सिस्टम लावण्याचे काम दिले होते त्यांचे बिल अदा केले नाही नेमकी अडचण काय आहे.

मा.उपमहापौर :कशामूळे ते संबधीताचे काम बंद केले. आमचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होतो काय ?

कार्य.अभियंता(अ,क,ड) :खाजगी संस्थे मार्फत काम करून घेत होतो एका वेळेसचे ६० हजार चार्ज घेत होते तेच काम आता १० हजार मध्ये करून घेत आहोत.

मा.उपमहापौर :त्यांचे पैसे कमी करावे काम करून घ्यावे वंदेमातरम गित १० वेळेस चालू बंद झाले ही वाईट परीस्थिती आहे यापुर्वी महापौर निवडणुकीच्या वेळेस पिठासीन अधिकारी मा.जिल्हाधिकारी होते तेंव्हाही माईक बंद पडले होते. इतर ठिकाणी पैसे असतात. आमचा आवाज कमी करण्याचा प्रयत्न करू नये. जेथे सदस्यांचे विषय येतात तेथे पैसे नसतात शिवजयंतीच्या वेळी रोषणाई करण्याला पैसे नसतात. बाकी कामे कशी होतात तेव्हा आम्हाला विचारत नाही.

मा.महापौर :माईक सीस्टम व्यवस्थीत नाही. यासाठी तरतूद करायला पाहिजे होती.

कार्य.अभियंता(अ,क,ड) : यासाठी अंदाजपत्रक तयार केले आहे मंजूरी होणे आहे.

मा.आयुक्त :श्री. कोल्हे यांचेकडून विद्युत विभाग काढून घेत आहे. साधी गोष्ट आहे सभा सुरू होण्या पुर्वी माईक चालू आहे की नाही आधी ट्रायल घेतली पाहिजे. शहर अभियंता यांची जबाबदारी आहे. त्यांनी ही याकडे लक्ष दिले पाहिजे.

शहर अभियंता :अल्टीमेट जबाबदारी शहर अभियंता म्हणून माझीच आहे.दरवर्षी जयंती साजरी होते पुतळयाच्या ठिकाणी विद्युत रोषणाई केली की नाही खात्री केली नाही यात चूक झाली आहे मा.महापौर यांचा फोन आला त्यानंतर कर्मचारी यांना कामाला लावले.

मा.महापौर : मी स्वत: व स.पदाधिकारी यांनी सर्व तयारी करण्याचे सांगितले होते. आमचाही काही अधिकार आहे वेळीच विद्युत रोषणाईचे काम का केले नाही?

शहर अभियंता :मान्य आहे चुक झाली आहे. एक दिवस अगोदर लावायला पाहिजे. तसेच सभागृहतील माईकची व्यवस्था अत्याधुनिक पध्दतीने करण्यासाठी येत्या तीन दिवसात मार्केट मधील दर घेवून कोटेशन मागवून एक महिन्याच्या आत येणा-या सर्वसाधारण सभेपुर्वी सभागृहातील जी व्हीडीओ माईकची व्यवस्था करण्याची कार्यवाही होईल.

मा.महापौर :एका टेबलवर दोन माईकची व्यवस्था करावी.

श्री.अफसर खान : अधिकारी यांचे पदोन्नतीच्या प्रकरणात मा.मुख्यमंत्री महोदय यांचेवर कन्टेम दाखल करण्यात आले. या बाबत चौकशी व्हावी संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही का केली नाही.

मा.आयुक्त :महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री यांचेवर कन्टेम दाखल होतो. म्हणजे प्रशासक म्हणून माझ्यावरही दाखल झाले. या संदर्भात उत्तर दिलेले आहे. जी कार्यवाही करायची ती जो पर्यंत मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होणार नाही तोपर्यंत कार्यवाही करू शकत नाही. कन्टेम दाखल केला म्हणून ॲक्शन घेतली असा अर्थ होईल. वेळ येईल तेंव्हा कार्यवाही होईल.

श्रीमती माधुरी देशमुख :ज्या त्या वेळी महापुरूषाच्या जयंती, पुण्यतिथी असेल त्या त्या वेळी त्या त्या पुतळयाच्या ठिकाणी विद्युत रोषणाई व तेथील स्वच्छता व्हावी.

मा.महापौर :सर्व सदस्यानी आपआपल्या वॉर्डातील पुतळे स्वच्छ व तेथे साफसफाई राहील यासाठी पुढाकार घेऊन काळजी घेतली तर प्रशासनाकडून तसे काम करून घेता येईल.

**<u>विषय क्रमांक ३००:-</u>**

सोमवार दिनांक १४.०९.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०७) तसेच सोमवार दिनांक १४.१२.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-११) रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद:-</u>**

श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ :मा.महापौर दिनांक १४.०९.२०१५ व दिनांक १४.१२.२०१५ च्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त कायम करण्यात यावे. याबरोबरच माहे जानेवारी-२०१६ पर्यंत झालेल्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

मा.उपमहापौर :विषय मंजुर करण्यात यावा.

श्रीमती समीना शेख :दिं.१४-९-२०१५ च्या इतिवृत्तात प्रश्न दिला की बायजीपुरा इंदिरानगर भागातील रस्त्यातील अतिक्रमण हटवावे कार्यवाही केली नाही.

मा.महापौर :प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :वार्ड क्र.१८ मधील विद्यापीठ गेट ते मकई गेट बेगमपुरा रस्त्यावर ओपनस्पेस वर अतिक्रमण केले.१२ फुटाची गल्ली अतिक्रमण केले ५-५ फुट जागा होती लोकांना टीडीआर पैसे देऊन जागा घेतली आता तेथे अतिक्रमण झाले. ३ महिण्यापुर्वी पत्र दिले अद्याप कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त :या संदर्भात मी स्वतः पाहणी करील .

श्रीमती किर्ती शिंदे :मिलकॉर्नर ते औरंगपूरा व निराला बाजार ते महापालिका कार्यालय या रस्त्याचे १० वर्षापासून काम केले नाही. २४ कोटी शासनाने रस्त्यासाठी निधी दिला त्यातून त्वरीत काम करावे.

श्री.नंदकुमार घोडेले :दिनांक १४-९-२०१५ च्या सभेत विषय क्रमांक १६२ नुसार जे विना परवानगी बांधकाम करील १० हजार दंड आकारातो परंतु जे जास्तीचे बांधकाम करतात त्यांनाही तेवढाच दंड त्यासाठी स्क्वे.मीटर किंवा स्क्वे.फुटा नुसार दर प्रस्तावित करून कार्यवाही करावी असा प्रस्ताव मंजूर केला अमलबजावणी केली का?

मा.महापौर :विषय मंजुर. सोमवार दिनांक १४.०९.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०७) तसेच सोमवार दिनांक १४.१२.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-११) रोजीच्या सर्वसाधारण सभांचे तसेच माहे जानेवारी-२०१६ पर्यंतच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २४.०७.२०१५ (दि.२०.०७.२०१५ रोजीची तहकुब सभा कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०५), दिनांक १४.०९.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०७), दिनांक १०.११.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०९), दिनांक १९.११.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-०८ दिनांक २०.१०.२०१५ ची तहकुब सभा), दिनांक २०.११.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१०), दिनांक १४.१२.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-११). दिनांक २८.१२.२०१५ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१२), दिनांक ०७.०१.२०१६ (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१३). दिनांक २८.०१.२०१६ (दिनांक २८.१२.२०१५ ची तहकुब सभा कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१२) रोजीच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.फिरोज खान :औरंगपूरा येथील नाल्यावरील इमारतीचा टॅक्स थकलेला आहे.

मा.महापौर :इतिवृत्तांवर बोलावे इतर विषयावर चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

श्रीमती समीना शेख :बायजीपूरा ६० फुटाचा रस्त्यावर अतिक्रमण झाले.

प्रशासकीय अधिकारी :नगररचना विभागाने मार्कीग करून दिल्यानंतर कार्यवाही करता येईल.

सहा.संचालक(न.र) :भुसंदपादनामध्ये जेवढे मोबदला मिळाले ती कार्यवाही केली. उर्वरीत कार्यवाही सर्वे चालू आहे मार्कीग करून जे मालमत्ता धारक आहे. टीडीआर किंवा एफएसआय घेणार असतील तो भाग स्लम असला तरी मालकी कन्फर्म करून अतिक्रमण असेल तर हटविले जाईल. पर्यायी जागा उपलब्ध नाही. एफएसआय टीडीआर जर १०० टक्के लोकांनी

| | |
|---|---|
| | घेतला तर मार्कींग करू. ओनरशीप त्यांची असेल तर मोबदला देता येतो. |
| श्रीमती समीना शेख | :स्लम भागासाठी टीडीआर लागू होत नाही. |
| सहा.संचालक(न.र) | :मालमत्ता रस्त्यामध्ये बाधीत होत असेल तर मोबदला देय होतो तीन प्रकारे मोबदला देता येतो. |
| मा.महापौर | :प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. |
| श्रीमती सुरेखा सानप | :माझ्या वार्डातील शाळेच्या कंपाऊंड वॉलचे व खोल्याचे बांधकाम करण्यात यावे, शाळेत पाणी दयावे. |
| मा.महापौर | :दोन दिवसात हा प्रश्न मार्गी लावावा तातडीने कार्यवाही सुरू करावी. महापालिकेच्या शाळा व आरोग्य केंद्र मनपाची कार्यालये येथे विना कॉस्ट पाणी देण्या बाबतचा ठराव प्रशासनाने घ्यावा. |
| मा.उपमहापौर | :जयभवानीनगर भागात दुषित पाणी येते. तेथे पाईप टाकणार होते अदयाप काम केले नाही. |
| मा.आयुक्त | :जेथे जेथे दुषित पाणी येते तेथे पाईप टाकण्याचे ठरविले होते संमातर एजन्सीने पाईप कमी आणले काही पाईप आलेले आहे. कालच सुचना दिल्याकी कोणत्या वार्डात किती डायमीटरची किती पाईप लाईन पाहिजे? सादर करण्याचे सुचविले त्या संचिकेवर सही झाली की पाईप येतील. यापुढे आयुक्तांच्या आदेशाशिवाय काम सुरू करणार नाही. |
| श्रीमती किर्ती शिंदे | :बडी गिरणी येथील मनपाच्या शाळेचा स्लॅब पडण्याच्या स्थितीत आहे. तेथे दुर्घटना होऊ शकते. वेळीच कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :या बाबत कार्यवाही करावी. |

**प्रश्नोत्तरे**

| | |
|---|---|
| प्रश्न क्रमांक ३५६ | :स. श्री.राजगौरव वानखेडे |
| श्री.राजगौरव वानखेडे | :गुंठेवारी संदर्भात प्रश्न केला पुर्ण नियमावलीची माहिती दयावी. |
| कक्ष प्रमुख -गुंठेवारी | :गुंठेवारी नियमीत करतांना २००१ पुर्वीचा प्रत्येक बाबतीत पुरावा मागितला जात होता. परंतु आता बांधकाम नंतर झाले असेल तरी नियमित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :गेल्या १५ वर्षात येथील अधिका-याला हा नियम समजला नाही का? जनतेला का वेठीस धरले गेले ११८ वसाहती शहरात आहे १५ वर्षात हा नियम लावला असता तर अनेक भाग गुंठेवारीत रेग्यूलर झाले असते. |
| कक्ष प्रमुख- गुंठेवारी | :२००१ पुर्वीचा भुंखड व नंतरचे बांधकाम असेल तर नियमित करता येत नाही परंतु भुखंड हा २००१ पुर्वीचाच व बांधकाम नंतरचे असे रेग्युलाईज करण्याचे सुरू केले आहे. २००१ पुर्वीचाच भुंखड नियमित करतो आहोत. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :२००१ पासून गुंठेवारी रेग्युलाईज झाली नाही अशा ठिकाणी आरक्षण टाकले असेल तर त्या बाबत काय कार्यवाही करणार आहे. २००६ मध्ये आरक्षण उठवायचे राहिले असेल तर त्यावर बांधकाम करू शकतो का? |

| | |
|---|---|
| सहा.संचालक(न र) | :प्लॅनींग ॲथॉरिटी सर्वसाधारण सभा आहे. सन-२००६ मध्ये जी आरक्षण डिलीट केलेले आहे. त्या आरक्षणावरील बांधकाम झाले असतील गुंठेवारी नियमित करू शकतो. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :२००६ मध्ये काही आरक्षणे उठवायची राहिली. त्या बाबतीत काय करणार आहे. |
| सहा.संचालक(न.र) | :२००६ मध्ये २००१ चे जे सादर झाले होते. त्यात पुर्ण शहराचा सर्वे करून जे आवश्यक वाटले तेवढे आरक्षण सर्वसाधारण सभेने डिलिट केले आहे. त्या वरतीच गुंठेवारी करता येईल. |
| श्री.सिताराम सुरे | :२००६ मध्ये जेवढे आरक्षण उठविले गेले त्याचा विचार करावा. |
| श्री.अय्युब जहांगीरदार | :नवीन विकास आराखड्यानुसार जेथे १०० टक्के घरे आहे तेथील आरक्षण उठवावे. |
| सहा.संचालक (न.र) | :२६ (१) नुसार नकाशा प्रदर्शित केला. त्यास शासनाची मंजूरी नंतर विचार करता येईल. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :रिसेल प्लॉट असेल तर त्याची गुंठेवारी नियमित करावी. |
| मा.महापौर | :योग्य ती कार्यवाही करावी. |
| श्री.जहागींर खान | :कटकट गेट ते पोलीस मेस पर्यंत रस्त्यातील अतिक्रमण हटवावे रस्त्याचे काम करावे. |
| मा.महापौर | :या रस्त्याच्या बाबतीत तातडीने काम सुरू करावे. |
| श्री. अय्युब जहागीरदार | :आझाद चौक ते चेलीपूरा पर्यंत ३० वर्षापासूनची जुनी वस्ती आहे आरक्षण टाकण्यात आले.१०० टक्के वसाहत आहे. आरक्षण हटवावे. |
| सहा.संचालक न.र | :२००६ साली त्यांचे कन्सलटेशन झाले असेल. त्यावेळी ते केलेले नाही. |
| श्री.चेतन कांबळे | :२००९ पर्यंत गुंठेवारी नियमित होणार काय, शासनास काय पत्र पाठविले खुलासा करावा. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :चिश्तिया कॉलनी १९८५ मधील वस्ती आहे. तेथे गुंठेवारी करतांना मालकाकडून एनओसी घेतो का? |
| श्री.शेख अब्दुल ताहेर | :२००१ च्या अगोदरचे प्लॉट असेल व त्यानंतरचे बांधकाम असेल तर रेग्युलर करता येते असे म्हटले हे करीत असतांना डेव्हलपमेंन्ट व कम्पॉन्डींग चार्जेस असे दोन चार्जेस आकारले जाते. कमीत कमी चार्जेस आकारावे. ही एकच रक्कम फिक्स करावी. तेवढीच घ्यावी सर्व लोक समोर येऊन रेग्युलाईज करतील व मनपाचे उत्पन्नही वाढेल. |
| श्रीमती संगिता वाघुले | :वार्ड क्र.३४ मध्ये गुंठेवारी नियमीत होत नाही. तेथे पाणी देत नाही. इतर सुविधा नाही. नागरीक आमच्याकडे येतात. मागणी करतात. |
| मा.महापौर | :मा.आयुक्त सविस्तर खुलासा करीत आहे. |
| मा.आयुक्त | :गुंठेवारी संदर्भात शासनाने जे नियम बनवले ते वाचल्यानंतर खरा अर्थ असा की, पुर्णच्या पुर्ण एरिया नियमीत करावा. तेथे रस्ते, ओपनस्पेस, पार्क, स्कूल ई.असावे. प्लॉट सुध्दा नियमीत करावा असे जीआर मध्ये आहे. या संदर्भात नगर विकास सचिव यांचे सोबत नागपूरचे महापौर, आयुक्तांची चर्चा चालू होती. मी ही उपस्थित होतो. त्यावेळी मला विचारले. लोकांच्या सोयीचे होईल असा अर्थ आपण घेतला पाहिजे. |

येथील घरे पाडून ओपनस्पेस लिगली कराव्यात. तो प्रश्न येथे नाही. प्लॉट नियमीत करता येत असेल तर ते केले पाहिजे. त्यानुसार प्लॉट नियमीत करण्याचा निर्णय घेतला. ११ हजार अर्ज आले होते. ७ हजार निकाली काढले लोक जेंव्हा येतात तेंव्हा काहीतरी त्रुटी काढून परत पाठविले जाते. अशा तक्रारी होत्या. कायदा आला तेंव्हा गुंठेवारीसाठी पैसे भरावे लागतात. काही तरी वेगळा टॅक्स आहे. असे वाटत असे परंतु आता कन्सेप्ट बदलली. अनेकांची पैसे भरून गुंठेवारी नियमीत करण्याची इच्छा आहे. मला असे सांगण्यात आले की, जो प्लॉट आहे त्यावरीत घरे ही २००१ च्या आधीची आहे. पुरावा नाही. तर बांधकाम ही २००१ च्या आधीची आहे कुठल्या बेसवर परवानगी देणार? परंतु जी आर मध्ये असे की २००१ च्या अगोदरच्या इमारतीसह असेल तर रेग्युलर करता येईल. जर ३१ डिसेंबर २००० ला प्लॉट घेतला, प्लॉट रिकामा ठेवला, तर गुंठेवारी मान्य करणार नाही घर बांधले तर एक दिवसात कसे बांधले असा प्रश्न येईल. नोटींगमध्ये सर्व आले आहे. इतर मनपा मध्ये काय चालले. ते बाजूला ठेवून कायदा काय म्हणतो ते बघू, गुंठेवारी हे प्लॉट नियमीत करण्याचे धोरण आहे. इमारत नियमीत करण्यासाठी एमआरटीपीमध्ये धोरण आहे. त्या प्लॉटवर काय आहे ते न बघता प्लॉट नियमीत करणे अगोदर आवश्यक आहे. २. गुंठेवारी नियमीत करण्यासाठी साधा सोपा फॉर्म तयार केला. उदया डीपी रोड काढला तर मोबदला देईल विना मोबदला जमिन घेऊ शकत नाही हा कायदा आहे. चिश्तिया कॉलनी ही वसाहत सिडकोच्या प्लॉटवर आहे तो प्लॉट एचएमटीला विकलेला होता. जे की एका व्यक्तीच्या नावाचा प्लॉटवर दुस-याने केलेले बांधकामाचा हा तो विषय आहे. त्यासाठी संबधीताची सोडचिठ्ठी लागेल. सिडकोकडे येऊन ले-आऊट करून सिडकोची मान्यता घ्यावी लागेल. आरक्षण होईल गुंठेवारीचा विषय येत नाही.गुंठेवारी जो पर्यत अस्तित्वात आहे तोपर्यत गुंठेवारी नियमीत करता येणार नाही. डीपी प्लॅन केल्यानंतर आवश्यकता वाटल्यास त्यात चेजेंस करण्याचे अधिकार सभागृहास आहे त्यानंतर शासन मान्यता देते त्यानुसार कार्यवाही होते. गुंठेवारीतून प्रशमन शुल्क जमा होते त्यातून ८० टक्के रक्कम तेथे खर्च करता येते. परंतु असाही निर्देश नाही की बाकी पैसे तेथे खर्च करता येत नाही. हे माझे मत आहे. गुंठेवारी संदर्भात शासन स्तरावर विचार होत आहे. तेथे सुविधा द्यायला पाहिजे. दुसरा विषय असा की गुंठेवारी भागात पाणी का देत नाही मुळात १३५ एमएलडी पाणी येते. डिमांड २०० ची आहे. आता नवीन कनेक्शन दिल्यास पाणी विस्कळीत होईल. ऑगस्ट-२०१७ पर्यंत नक्षत्रवाडीपर्यंत पाईपचे काम होईल असे समांतर एजन्सीने म्हटले आहे. त्यानंतर पाणीपुरवठयात वाढ होईल. या भागातही पाणी देता येईल.

श्री.रेणुकादास वैद्य :गुंठेवारी भागातून पाईप लाईन गेलेल्या आहे. काही ठिकाणी वेगळा खर्च येणार नाही.

मा.आयुक्त :जेथे ऑलरेडी पाणी दिले जाते तेथे पाणी दिले जाईल. पाईप न वाढविण्याचे कारण असे की, नवीन कनेक्शन सध्या द्यायचे नाही. कारण असलेल्या पाणीपुरवठयावर परिणाम होईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :गुंठेवारी रेग्युलाईजसाठी मुदत बाबत काय झाले?

मा.आयुक्त :गुंठेवारीसाठी डिसेंबर-२०१६ पर्यंत जी बी ने मुदतवाढीची मान्यता दिली आहे. त्या संदर्भात शासनाशी बोलावे लागेल. सन-२००९ पर्यंतची गुंठेवारी रेग्युलाईज करण्याचा ठराव शासनास पाठविला उत्तर आले की असे करता येणार नाही. हा राजकीय निर्णय आहे. पुर्ण राज्यात याचा परिणाम होणार आहे. सरकार विचार करून निर्णय घेईल. आपल्या स्तरावर काय करता येईल ते करू. स्वच्छतेचे अभियान सुरू केले होते. आधी पैसे द्यायचे की प्रशासनाने दिले विषय होता. या प्रोग्राम मध्ये महापालिकेचा एक पैसाही खर्च होणार नाही. जी संस्था काम करणार त्यांना फंडीग करणारी एजन्सी सीएम आणि बजाज ऑटो आहे. हे पैसे ते संस्थेला मनपाच्या परवानगीने देत नाही. हा त्यांचा व बजाज ऑटोचा विषय येतो. या संस्थेने व्यक्ती व प्रोग्राम नेमून जनजागृती करून प्रोग्राम पुढे न्यायचा मनपाकडून हे करणे शक्य झाले नसते वाळूज येथे नेमले तेंव्हा त्या कंपनीला पैसे दिले नाही. त्यांनी त्यांचे फंडस् द्यावे हा उद्देश होता. २४ लोक त्यांचेकडे आहे हुशार आहे. प्रोग्राम व इतर खर्च १.६० कोटीचा खर्च आहे. बजाज कंपनीने सदर कंपनीला पॅरामीटर ठरवून दिले की, दर महिन्याला अमुक तपासणी करू. आज घडीला या कंपनीला बजाज ऑटोने एक रूपयाही दिला नाही. पुढील तीन महिन्यातही देण्याची शक्यता नाही. कारण रजिस्ट्रेशन वगैरे आहे ते कार्यवाही चालू आहे. या सभेची मान्यता पाहिजे यासाठी ठराव आहे. या कंपनीशी माझे मत चांगले आहे. फ्रॉड करणारी एजन्सी नाही. या कंपनीवर लक्ष आहे. आपली मदत आवश्यक आहे. स्वच्छतेच्या बाबतीत आता वातावरण बदलले स.सदस्य ५-६ वाजता सकाळी वार्डात स्वच्छतेच्या कामासाठी फिरतात. अनेक स.सदस्य फिरतात या प्रोग्रामला शासकीय फंडीग करून पुन्हा यास कॉन्ट्रॅक्टशीपमध्ये टाकण्याची इच्छा नाही. स्वच्छ भारत अभियानासाठी डीपीआर बनवावा लागतो त्यास २५-५० लक्ष खर्च लागेल. पीएमसी नेमली असती तर खर्च लागला असता. ही कंपनी फुकटात डीपीआर करून देत आहे काम चालू आहे. ओला कचरा बाजूला काढतो आणि जाळतो. त्यातही संघर्ष सुरू झाले की, माशा होतात यासाठी बदलले पाहिजे. बजाज ऑटोकंपनीने असे म्हटले की पुर्ण कचरा वेगळा झाला तर बायोवेस्ट प्लँट तयार करण्याची तयारी आहे. अशा एक दोन कंपन्या हे करण्यास तयार आहे ही पुढची स्टेप आहे. हळू हळू पुढे जाऊ कचरा वेगळा होतो चांगल्या पध्दतीने कचरा जमा होत आहे त्यावेळी बायोवेस्ट प्लँन्टकडे जाता येईल. उद्देश असा की, कचऱ्यावर होणारा खर्च कमी झाला पाहिजे. काही ट्रॅक्टर व टिप्पर बंद करायचे

कारण काहीच्या कमी ट्रिपा होता. वार्डातील कामे करण्यासाठी ६ जेटींग मशीन घेणार आहोत. रस्त्याची सर्व कामे चालू होतील ३० टक्के पेमेंन्ट दिले आहे. (एलईडी दिवे संदर्भातील विषयाच्या ठिकाणी येथील चर्चा टाकण्यात आली) शाळेला अद्यावत करण्यासाठी काही खाजगी कंपनी पुढे येण्यास तयार आहे. त्या खर्च करतील विषय नसतांना बजाज ऑटोने असे सुचविले की, शाळेचे प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करावे. फंडीग दिले जाईल यासाठी पीएमसी करावी लागते. हे काम सीआरपीला दिले आहे त्यांनी कळविले की, इन्फ्रॉस्ट्रक्चर शाळेत काय करता येईल? यासाठी आकांक्षा नावाची संस्था आहे ती दिल्लीला काम करते. ते यावर अभ्यास करणार आहे. टीम इंडिया नावाची संस्था आहे. ते डीपीआर तयार करण्यास मदत करील डोनर तेच बनणार आहे. मार्च मध्ये त्यांना वेळ देता येईल. बजाज ऑटोशी माझे बोलणे झाले. ते फंडीग देण्यास तयार आहे. आपण सर्व स्कूल साठी एक डीपीआर तयार करीत आहोत. सर्व सुविधा तेथे मिळेल दान धर्म करणाऱ्या अनेक संस्था आहे. आपला पैसा वाचेल व इतर कामासाठी तो खर्च करता येईल. १५ लक्ष प्रत्येक वार्डात खर्च करण्यासाठी दिले. कालातंराने उत्पन्न वाढले तर आणखी निधी देता येईल. मालमत्ता कर वसुलीसाठी २००५-०६ टेंडर बनविले होते. ते आहे त्यांचा डेटा तयार केला. फ्रेश टेंडर मागविणार आहोत. त्यात सविस्तर माहितीसह घेणार आहे. सर्व कॅल्क्युलेट करून देतील एक कंपनी ॲप्लीकेशन तयार करून देते आपले घराचे एरिया टाकल्यानंतर ॲटोमॅटीकली टॅक्स कलेक्ट होईल. हि जनतेपर्यंत माहिती देऊ व ऑनलाईन टॅक्स कसा जमा करता येईल त्या संबंधी कार्यवाही होईल.

श्री.सिताराम सुरे :कर भरणा टप्प्या टप्प्याने वसुल करावा.

मा.आयुक्त :नागरीकांनी स्वतः कर भरणा केला पाहिजे. अशी परीस्थिती निर्माण करून पैसे आल्याशिवाय विकास होणार नाही. ३०-४० टक्के मिळकतीचा टॅक्स वसुल करतो. वार्ड कार्यालयाच्या बाजूच्या इमारतीला टॅक्स नाही. टेंडर काढल्यानंतर डेटा गोळा करून ऑनलाईन टॅक्स भरण्याची सिस्टम सुरू करू. काही ठिकाणी निवास म्हणून मिळकत तेथे दुकान आहे टॅक्स निवासी लागलेला हे बंद करावे लागेल. काही ठिकाणी टॅक्स ७०० इमारत चार मजली आहे. ३००-४०० कोटी टॅक्स वसुल करू शकतो. प्रत्येक वार्डात २६ लक्ष खर्च करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्रीमती ज्योती अभंग :जेंटींग मशीन प्रत्येक वार्डसाठी उपलब्ध असावे.

मा.आयुक्त :६ जेंटींग मशीन घेत आहोत. मायनॉरीटीचा फंड २ कोटी आलेला आहे. यामध्ये मुस्लिम बहुल बौध्द बहुल ख्रिश्चन बहुल असा भाग येतो. यात दोनकामे आहे मला जे योग्य वाटते याची कमेटी आहे. त्यात मा.विभागीय आयुक्त व महापालिका आयुक्त व जिल्हाधिकारी आहेत. जो काही फंड येईल तो या सभेच्या मान्यतेने पुढे गेला पाहिजे. त्यात

एक काम असे की, शादीखाना जेथे मुस्लीम समाज आहे गरीब लोक लग्न वगैरे करतात. ती व्यवस्था करण्याचे प्रपोजल आहे. एक कोटी खर्च होईल. तसेच अब्दुल हमीद परमवीरचक्र अब्दुल हमीद सभागृह आहे ते दुरूस्तीसाठी खर्च करावा लागेल. रु.७५ लक्ष शिल्लक राहतात. सभागृहाने ठरवावे, प्रपोजल द्यावे. दुष्काळ तोंडावर जायकवाडीचे पाणी कमी होत आहे. मार्च मध्ये दुसरे पंपीग सुरू करावे लागेल. ऑगस्ट पर्यंत आवश्यक पाऊस आला नाही. तर त्या परिस्थितीला सामना करण्यासाठी आणखी पंप सुरू करावे लागेल.

मा.महापौर :याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

मा.उपमहापौर :हे सर्व करण्यासाठी आयुक्त म्हणून केंद्रेकर साहेबांनी येथे रहावे.

श्री.नंदकुमार घोडेले :दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वस्तीगृह सुरू करण्यात यावे.

मा.महापौर :२० मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.

(वेळ १.१५ पुन्हा सभा २.१५ सुरू)

प्रश्न क्रमांक ३६४ :स.श्री.गंगाधर ढगे

श्री.गंगाधर ढगे :गट नं. ५४ व ५५ बांधकाम परवानगी दिली आहे ऑलरेडी बाजूला नैसर्गीक नाला वाहतो. भुखंड सोडून चार मजली इमारत उभी केली. परवानगी कुठे व कशी दिली होती? नकाशामध्ये नाल्याचा उल्लेख नाही. उत्तर दिले नाल्याचा उल्लेख नसेल तर बांधकाम परवानगी कशी दिली? उत्तरेला भिंत करायला पाहिजे होती. अधिकाऱ्यांच्या संगनमताने नाल्यावर इमारत उभी केली जाते. तेथे ४०-४० प्लॉट विक्री होणार. त्या नागरीकांना धोका दिला जात आहे. त्या इमारतीवर कार्यवाही व ज्यांनी दुर्लक्ष केले त्यांचेवर ही कार्यवाही करावी.

सहा.संचालक (न.र) :या प्रश्नाचे उत्तर त्यांना दिलेले आहे. नैसर्गिक नदी नाले प्रवाह मध्ये बांधकाम परवानगी देण्यात येत नाही. गट क्र. १ पैकी नक्षत्रवाडी भू.क्र. ५४.५५ या भूखंडावर श्री. मुरलीवाला बिल्डर्स भागीदार श्री मुरलीधर आनंदीलाल शर्मा व इतर या नावाने म.प्रा.नि.व न.र. अधि. १९६६ च्या तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देण्यात आली. मंजूर नकाशानुसार तेथे नाला प्रवाह दर्शविण्यात आलेला नाही. डीपी प्लॅन नाही तसेच तालुका निरीक्षक भुमि अभिलेख यांचे नकाशातही नाला दर्शविला नाही. जागेवरील परिस्थितीनुसार परवानगी दिली आहे.

श्री.गंगाधर ढगे :बाजूला संरक्षीत भिंत केली नाही. नाल्याचा प्रवाह बदलला बाजूला नाली केली. नाल्यात बांधकाम केले. ४ कोटीचा प्रोजेक्ट आहे. जे घेतील त्या नागरीकांचे नुकसान होणार आहे.

सहा.संचालक :बांधकाम करण्यासाठी नाला संरक्षीत भिंत बांधावी असे स्पष्ट अट नमूद आहे. नकाशावरही तसे आहे. प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून कार्यवाही केली जाईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :कार्यवाही करावी तोपर्यत स्थगिती दयावी.

मा.महापौर :आठ दिवसांत तेथे पाहणी करावी व माझ्याकडे व स.सदस्यांना माहिती दयावी कार्यवाही करावी. तो पर्यंत काम थांबविण्यात यावे.

| | |
|---|---|
| प्रश्न क्रमांक ३६५ | : |
| उपआयुक्त (मा.म.) | :बेस्ट प्राईजला वार्षीक ६.७२ लक्ष कमर्शियल मालमत्ता कर आहे २५ टक्केचे चेक देतात तीन टप्पे भरले एक बाकी आहे. |
| श्री.गंगाधर ढगे | :हा टॅक्स कमी आहे तपासून घ्यावे. |
| मा.महापौर | :संबंधीत अधिकारी यांनी बेस्ट प्राईजला आकारलेला टॅक्स कमी आहे का? तपासून घ्यावे. |
| प्रश्न क्रमांक ३६८ | :स.श्रीमती सायरा बानो खान |
| श्रीमती सायरा बानो खान | :कब्रस्तान मध्ये चौकीदार वॉचमन देणार होते का दिले जात नाही? |
| उपआयुक्त(आस्थापना) | :प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. वॉचमनची १८ पदे मंजूर आहे. ते कर्मचारी स्मशानभुमीमध्ये दिले आहे. मुस्लीम कब्रस्तानमध्ये एका ठिकाणी वॉचमन दिले आहे. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :सर्वे केला. ६० कब्रस्तान मध्ये वॉचमन आहे. येथे वॉचमन द्यावे. ठराव केला अंमलबजावणी केली नाही. स्मशानभुमीसाठी पैसे ठेवतो कब्रस्तानसाठी ही ठेवावे. कब्रस्तानमध्ये ही प्रेताचे दफन करण्यासाठी खोदकाम करावे लागते. त्या लोकांना पैसे द्यावे लागतात. |
| श्री.अफसर खान | :ठराव मंजूर केलेला आहे. अंमलबजावणी होत नाही. वॉचमन व वॉचमनसाठी रूम देण्यात यावे. |
| मा.महापौर | :मोठ मोठी कब्रस्तान शहरात आहे. अशा कब्रस्तानमध्ये वॉचमनची ताबडतोब व्यवस्था करावी. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :जे लोक कब्रस्तानमध्ये काम करतात त्यांचा विचार करावा त्यांनाच काम द्यावे. |
| प्रश्न क्रमांक ३७० | : |
| श्रीमती खान सायरा बानो | :पिण्याच्या पाण्यावर व्याज आकारले जाते. हे अधिकार कुणी दिले? दररोज पाणी दिले व बिल भरले नाही, तर व्याज आकारणे योग्य वाटते. |
| कार्य.अभियंता (पापू) | :संबंधीत सदस्या यांना उपविधीप्रमाणे उत्तर दिले आहे. |
| श्री.अजीम अहेमद | :माझ्या वार्डात घाण पाणी येते. पाच दिवसानंतर पाणी येते. पाणी वेळेवर व ठरलेल्या दिवशी देणार नसेल तर, कर ही वसुल करू नये. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :पुर्ण भागात पाण्याची समस्या आहे. अगोदर मुबलक पाणी दयावे त्यानंतर व्याज आकारणे योग्य वाटते. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :रेग्युलर दररोज पाणी दयावे त्यानंतरच विलंब शुल्क आकारावे. |
| शहर अभियंता | :१८ टक्के विलंब शुल्क आकारणे बाबत सभागृहानेच मंजूरी दिली आहे. पाणीपुरवठ्यावर जो खर्च येतो त्याप्रमाणे पाणीपट्टी आकारणी होते. एक नळाला पाणी देतो त्यासाठी ५४०० इतका खर्च येतो. |
| श्रीमती मुल्ला सलीमा बेगम | :माझ्या वार्डात २०-२५ वर्षापुर्वीची लाईन आहे. घाण पाणी येते तेथे काम करण्यासाठी अंदाजपत्रक केले काम का होत नाही? |
| शहर अभियंता | :समांतर कडे काम दिलेले आहे. अनेक कामाचे टेंडर कॅन्सल केले होते. ज्या ज्या ठिकाणी घाण पाणी येते तेथे काम करणार आहे. |
| श्रीमती ज्योती नाडे | :माझ्या वार्डात ८-१० दिवसापासून पिण्याच्या पाण्यात घाण पाणी येते. |

श्री.नंदकुमार घोडेले :समांतरचे प्रत्येक वार्ड निहाय कार्यालय असावे. दुषित पाणी येते तेथे तातडीने कामे करावीत.

श्री.अब्दुल नाईकवाडी :समांतर एजन्सी ठरल्या प्रमाणे पाणीपुरवठा करीत नाही.

मा.महापौर :पाण्याचे प्रश्न नेहमीच उपस्थित अनेक भागात पाण्याचा प्रश्न आहे. प्रशासन गंभीर नाही. ही बैठक नंतर घेतली जाईल. मा.आयुक्त श्री. केंद्रेकर साहेब यांना कायम स्वरूपी तीन वर्षाकरीता येथे ठेवण्याचा ठराव आहे तो मंजूर करण्यात येतो. प्रशासनाचे विषय आहे. शासनाकडे पाठवायचे मंजूर करण्यात येते. सातारा संदर्भात दवाखान्याचा विषय आहे. मंजूर, एलईडी दिवेचा विषयात मा.न्यायालयाचा मान राखून हा चांगला विषय आहे. मनपाचा फायदा आहे. मंजूर करण्यात येते.

(विषय क्रमांक ३०३,३०७,३२४,३३६,३३७ व ३३८ ते ३४३ हे विषय घेण्यात आलेले आहेत.)

**विषय क्रमांक ३०३:-** (आरोग्य विभाग)

प्रस्ताव सादर करत आहेत की, मा.सर्वसाधारण सभा दिनांक 31.12.2013 (दिनांक 19.12.2013 ची तहकुब) मधील विषय क्रमांक 414 प्राप्त मंजूरी नुसार राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम राबविण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. सदरील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत नविन 8 आरोग्य केंद्र सुरु करण्यास मा.आयुक्त (कुक) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्रं.एनयूएचएम/ बांधकाम व दुरुस्ती/130832-131004/15 दिनांक 20 जानेवारी 2015 अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे.

शासनास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार 8 ठिकाणी नागरी आरोग्य केंद्र सुरु करण्यास मंजूरी प्राप्त झालेली आहे. एकूण 8 ठिकाणापैकी 2 (गांधीनगर, पवननगर-सिडको एन-7) जागा उपलब्ध झालेली आहे. याकरिता मा.सर्वसाधारण सभा दिनांक 14.9.2015 विषय क्रं.173 नुसार नविन आरोग्य केंद्र बांधकामास मंजूरी प्राप्त झालेली आहे.

नविन 6 ठिकाणच्या जागेकरिता आरोग्य वैद्यकीय अधिकारी, सहाय्यक संचालक, नगररचना, मालमत्ता अधिकारी व कार्यक्रम अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी (एनएचएम) यांनी पाहणी केल्यानुसार व जागेची उपलब्धता झाल्यानुसार 6 ठिकाणी नविन आरोग्य केंद्र बांधकाम करणे व आरोग्य केंद्र कार्यान्वीत करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

खालील प्रमाणे नविन आरोग्य केंद्राचे बांधकाम करणे व आरोग्य केंद्र सुरु करण्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. भारतनगर-रेल्वेपटरी जवळील भाग
२. चेतनानगर पुर्नवसित भाग (हर्सुल जटवाडा रोड)
३. आरेफ कॉलनी मनपा शाळा परिसरामधील जागा
४. मनपा शाळा गणेश कॉलनी परिसरामधील जागा
५. शिवाजीनगर जैन मंदीराजवळील जागा
६. कबीरनगर येथील संत गाडगेबाबा सांस्कृतिक सभागृह

उपरोक्त नविन ६ ठिकाणी प्राप्त जागेच्या प्रस्तावानुसार सदरील ठिकाणी नविन आरोग्य केंद्र बांधकाम व आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी शासनातर्फे अनुदान प्राप्त होणार आहे. तसेच मनुष्यबळ व इतर आवश्यक साहित्य प्राप्त होणार आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणे व शासनाच्यामंजूरीच्या अधिन राहून कार्यवाही करावी लागणार आहे. करिता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रमाअंतर्गत शासनातर्फे अनुदान तसेच मनुष्यबळ व इतर आवश्यक साहित्य प्राप्त होणार असल्याने खालील नविन ६ ठिकाणी आरोग्य केंद्र बांधण्यास व आरोग्य केंद्र सुरु करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यास व शासन मंजूरीच्या आधिन राहून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

१. भारतनगर-रेल्वेपटरी जवळील भाग,
२. चेतनानगर पुर्नवसित भाग (हर्सुल जटवाडा रोड),
३. आरेफ कॉलनी मनपा शाळा परिसरामधील जागा,
४. मनपा शाळा गणेश कॉलनी परिसरामधील जागा,
५. शिवाजीनगर जैन मंदीराजवळील जागा,
६. कबीरनगर येथील संत गाडगेबाबा सांस्कृतिक सभागृह

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३०७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त म्हणुन श्री.सुनिल केंद्रेकर साहेबांनी पदभार घेतल्यापासुन शहरातील समांतर जलवाहीनीच्या कामाला गती मिळालेली आहे. भुमीगत गटार योजनेचे काम सुरळीत झालेले आहे. प्रशासनाच्या कामात गती आलेली आहे तसेच त्यांच्या प्रयत्नामुळे शहर अतिक्रमण कॅरीबॅग व कचरा मुक्त होणार आहे.प्रशासनाला आर्थीक शिस्त लावली.सामाजिक बांधीलकीच्या दृष्टीकोनातून महापालिकेचा कारभार चालवून महापालिकेचे होणारे आर्थीक नुकसान टाळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले.

तसेच विशेष म्हणजे मा.आयुक्तांनी मनपा कर वसुली संदर्भाने केलेले प्रयत्नामुळे कोटयावधी रुपयाची वसुली झालेली आहे. ज्यामुळे मनपा आर्थिक अडचणीतुन बाहेर येईल व शहराचा विकास ही होईल.

महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि शहरातील जनता यांची तिव्र इच्छा आहे की,मनपाचे कर्तव्यदक्ष प्रभारी आयुक्त श्री.सुनिल केंद्रेकर यांना पुढील कार्यकाळासाठी पुर्णवेळ आयुक्त म्हणून कायम ठेवावे व तसा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविण्यात यावा म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:** श्री.प्रमोद राठोड,श्री.दिलीप थोरात,श्री राजेंद्र जंजाळ, श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख,

**अनुमोदक:**श्री.रेणुकादास वैद्य,श्री.भगवान घडमोडे,श्री.गजानन बारवाल,श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी, श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद, श्री.सोहेल शकिल शेख, श्री.अय्युब खान हुसेन खान

मा.महापौर : सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात येतो. शासनाकडे ठराव पाठविण्यात यावा.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे कर्तव्यदक्ष प्रभारी आयुक्त श्री.सुनिल केंद्रेकर यांना पुढील कार्यकाळासाठी पुर्णवेळ आयुक्त म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेत कायम ठेवावे असा ठराव सभागृह सर्वानुमते मंजूर करीत आहे. पुढील कार्यवाहीसाठी ठराव राज्य शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३२४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, (१) ८ मार्च-२०१६ जागतीक महिला दिनानिमित्त महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या सर्व महिला कर्मचाऱ्यांची व महिला नगरसेविकांची आरोग्य तपासणी करण्यात यावी. (२) या वर्षी महिला व बालकल्याण समितीला १४ वर्ष पुर्ण होत असल्यामुळे ५५ ते ६० या वयोगटातील सर्व वर्ग १ ते ४ मधील महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात यावा तसेच सर्व महिलांना भोजन व्यवस्था करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती सिमाताई गणपत खरात **अनुमोदक:-** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

**संवाद :-**

श्रीमती सिमाताई खरात :५५ ते ६० या वयोगटातील सर्व स.महिला नगरसेविकांचाही सत्कार करण्यात यावा.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ८ मार्च-२०१६ रोजी जागतीक महिला दिनानिमित्त महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या सर्व महिला कर्मचाऱ्यांची व स.महिला नगरसेविकांची आरोग्य तपासणी करण्यास तसेच ५५ ते ६० या वयोगटातील सर्व स.महिला नगरसेविका, वर्ग १ ते ४ मधील सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यास व सर्व महिलांना भोजन व्यवस्था करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र-१६, भावसिंगपुरा अंतर्गत येणाऱ्या वसाहती दिपनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर या वसाहतींमध्ये ५०% पेक्षा जास्त दलित लोक असून ते अनेक वर्षापासून सदरील मुलभूत सुविधांपासून वंचित आहे. म्हणजेच पीण्याचे पाणी, ड्रेनेज लाईन,लाईट, विद्युत पुरवठा, पथदिवे,सभागृह,रस्ते इ. सुविधा मिळण्याकरीता या वसाहतीस दलित वस्तीचे सर्वेक्षण करून सदरील वस्तीस दलित वस्ती म्हणुन घोषित करून दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी मिळणे करीता प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याकरीता सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**सुचक:**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:**श्रीमती मिना रामदास गायके

**संवाद:-**

श्रीमती मनिषा विनोद लोखंडे :मा.महापौर गितानगर, साठेनगर, भीमनगर, प्रभातनगर, नवयुवक कॉलनी व पंडित नगर या वसाहती अनेक वर्षापासून पिण्याचे पाणी,डेनेज लाईन, लाईट, विद्युत पुरवठा, पथदिवे, सभागृह, रस्ते इ.मुलभूत सुविधा पासून वंचित आहेत. तसेच या ठिकाणी असलेल्या दोन स्मशानभुमीत आरसीसी शेड उभारण्यात यावेत. इ. सुविधा या वसाहतीस मिळण्याकरीता दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध व्हावा ही विनंती.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र-१६, भावसिंगपुरा अंतर्गत येणाऱ्या दिपनगर, मुक्ताईनगर, बॉबीनगर या वसाहती दलित वस्ती म्हणुन घोषित करण्यास तसेच या वसाहतींमध्ये पीण्याचे पाणी,

ड्रेनेज लाईन,लाईट, विद्युत पुरवठा, पथदिवे,सभागृह,रस्ते इ. सुविधा मिळण्याकरीता दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी मिळण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच गितानगर, साठेनगर, भीमनगर, प्रभातनगर, नवयुवक कॉलनी व पंडित नगर या दलित वसाहतींमध्ये मुलभुत नागरी सुविधा पीण्याचे पाणी, ड्रेनेज लाईन,लाईट, विद्युत पुरवठा, पथदिवे,सभागृह,रस्ते इ. तसेच या ठिकाणी असलेल्या दोन स्मशानभुमीत आरसीसी शेड उभारण्यास दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी मिळणे करीता मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अल्पसंख्यांक बहुल वसाहत विकास योजनेअंतर्गत वॉर्ड क्र-१६, भावसिंगपुरा, अंतर्गत आमेन चौक पासून ते मनपा कत्तलखान्याकडे व पडेगाव मारुती मंदीर ते कत्तलखान्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे.

सदरील भागात ५०,००० लोकसंख्येची वसाहत आहे व त्या भागात कासंबरी नगर येथे मुस्लिम अल्पसंख्यांकाची संख्या जास्त असून कासंबरी दर्गा असून तेथे अनेक भाविक दर्शनास येतात. तसेच याच रस्त्यावर स्मशानभुमी असून भावसिंगपुरा, प्रभातनगर, निसर्ग कॉलनी, भीमनगर, लालमाती परिसरातील नागरीक या रस्त्याचा वापर करतात. या भागात बौध्द, ख्रिश्चन व मुस्लिम नागरीक जास्त संख्येने असल्याने सदर रस्त्याचे काम अल्पसंख्यांक बहुल विकास अंतर्गत करण्याकरीता निधी मिळणेसाठी सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविणे करीता सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**सुचक:-** श्रीमती मनिषा विनोद लोखंडे **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके

**संवाद:-**

श्रीमती मनिषा लोखंडे :मा.महापौर, व्हाईट टॉपींग ऐवजी सदरील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्यात यावे.

मा.महापौर :विषय दुरूस्तीसह मंजुर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र-१६, भावसिंगपुरा, अंतर्गत आमेन चौक पासून ते महानगरपालिका कत्तलखान्याकडे व पडेगाव मारुती मंदीर ते कत्तलखान्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे अल्पसंख्यांक बहुल विकास योजनेअंतर्गत पुर्नडांबरीकरण करण्यास व सदरील कामासाठी निधी मिळण्यास प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्रमांक ३३८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९३ पुंडलिक नगर मधील पहाडे कॉर्नर ते मातोश्री चौक हा रस्ता चार वॉर्डांना जोडणारा मुख्य रस्ता असून तो अतिशय खराब झालेला आहे. हा रस्ता व्हाईट टॉपींगचा करण्यासाठी अंदाजे खर्च रक्कम रुपये ९०.०० लक्ष अपेक्षित आहे परंतु मनपाची सध्याची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्यामुळे या रक्कमेच्या ५०% रक्कम रुपये ४५.०० लक्ष जिल्हा नियोजन समितीकडून मिळविण्यासाठी मा.पालकमंत्री ना.श्री.रामदासभाई कदम यांचेकडे शिफारस करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मिनाताई रामदास गायके **अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९३ पुंडलिक नगर मधील पहाडे कॉर्नर ते मातोश्री चौक हा रस्ता व्हाईट टॉपींगचा करण्यासाठी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रुपये ९०.०० लक्षास मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील रक्कमेच्या ५०% रक्कम रुपये ४५.०० लक्ष जिल्हा नियोजन समितीकडून मिळविण्यासाठी मा.पालकमंत्री ना.श्री.रामदासभाई कदम यांचेकडे शिफारस करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सातारा-देवळाई नगर परिषद क्षेत्र शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यामुळे सातारा-देवळाई भागातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यासाठी जलवाहिन्या टाकणे, ड्रेनेज लाईन टाकणे, पथदिवे लावणे, रस्त्यांची मजबुतीकरण, दुरूस्ती व डांबरीकरण करणे ही कामे प्राधान्याने करणे गरजेचे आहे. ह्या नागरी सुविधा पुरविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे.

उपरोक्त बाब लक्षात घेता, सातारा-देवळाई भागाकरीता नागरी सुविधा पुरविण्यासाठी साधारणत: र.रु.१०० कोटीचा निधी मागण्यासाठी महानगरपालिका प्रशासना मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. डी.पी.आर. तयार करणे व निधी मिळण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी महापालिका आयुक्तांना अधिकार प्रदान करावेत.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत **अनुमोदक:-**श्रीमती सुनिता तुकाराम आऊलवार

मा.महापौर :विषय मंजुर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सातारा-देवळाई भागाकरीता नागरी सुविधा पुरविण्यासाठी साधारणत: र.रु.१०० कोटीचा निधी मागण्यासाठी महानगरपालिका प्रशासना मार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, डी.पी.आर.तयार करणे व निधी मिळण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मा.महापालिका आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३४०:-**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील अस्तीत्वात असलेले संपुर्ण पथदिवे काढुन त्या ठिकाणी उर्जा बचत/LED/तत्सम प्रकारचे पथदिवे BOT तत्वावर लावणे तसेच मुलभुत सुविधांची (Infrastructural works) कामे करणे, या बाबतच्या प्रस्तावास BOT पध्दतीने काम करण्यासाठी निविदा तयार करणे, निविदेच्या अटी/शर्ती ठरविणे करीता आयुक्त, महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मा.सर्वसाधारण सभा दि. २०.०५.२०१४ ठराव क्र. ४५७ अन्वये स्विकृतीसह मंजुरी देण्यात आलेली आहे.

वरील मंजुरीप्रमाणे कार्यालयीन पत्र जा.क्र. २५६/दि ३०.०७.२०१४ प्रमाणे निविदा प्रसिध्दीस देण्यात आली. सदर निविदेच्या संदर्भाने प्राप्त होणा-या निविदांचे तांत्रिक कागदपत्रे तपासणी करणे, आर्थिक व्यावसायिक बाबी तपासणी, प्राप्त निविदा दर इ. बाबी तपासुन, अभ्यास करुन निविदा अंतिम करण्यासाठी मा.आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, विधी सल्लागार व विभाग प्रमुख (विद्युत) यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने प्राप्त झ ाालेल्या निविदांपैकी ०१.पॉलीकॅब वायर्स प्रा. लि. ०२. शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) ०३. इलेक्ट्रॉन लायटिंग

सिस्टीम प्रा.लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Venture) अशा एकुण तीन निविदांची तपासणी केली असता मे.पॉलीकॅब वायर्स प्रा.लि. आणि शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) यांच्या निविदा कंत्राटदार निविदेतील तांत्रिक पात्रतेचे निकष पुर्ण करीत नसल्याने बाद ठरविण्यात आल्या. आणि इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा. लि. आणि पॅरागॉन केबल इंडिया (Joint Venture) यांची निविदा उघडण्याचा निर्णय झाला.

प्राप्त निविदेप्रमाणे

| | |
|---|---|
| Part-A | :Rs.८६,९३,१७,४००/- |
| Part-B | :Rs.२५,२८,५०,६८०/- |
| Part-C | :Rs. ४४,५७,९२,८९६/- (Cost to AMC for Electricity Bill for 10 years) |
| Part-D | :Rs. ९,१२,००,०००/- (दोन वर्षाची देखभाल दुरुस्ती रक्कम) |

आणि पात्र कंपनी/ठेकेदार यांनी रु. २,७२,००,०००/- EMI ची मागणी केली व या EMI मध्ये ठेकेदाराने Part-A आणि Part-B ची ११२,२१,६८,०८०/- रुपयांची कामे करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या संदर्भाने सविस्तर चर्चा करुन समितीने इतिवृत्त जा.क्र. ३३५/दि.०२.०९.२०१४ प्रमाणे मान्यता दिली आहे.

या सर्व बार्बीसह प्राप्त झालेली निविदा मा.स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी सादर केली असता स्थायी समितीने प्रस्तावास विषय क्र.६९ दि.०३.०९.२०१४ नुसार मान्यता प्रदान केली आहे. यानंतर रितसर कार्यवाही करुन कंत्राटदारासह करारनामा करुन त्यास कार्यादेश जा.क्र.३४० दि.०३.०९.२०१४ अन्वये काम सुरु करण्याचा आदेश देण्यात आला.

या आदेशास आणि निविदा मंजुरी प्रक्रियेस मे.पॉलीकॅब वायर्स प्रा. लि. आणि शाह इन्व्हेस्टमेंट फायनांशियल डेव्हलपमेंट अँड कन्स्ट्रक्शन कं.लि. आणि कंट्रोल ऑटोमेशन प्रा. लि. (Joint Venture) यांनी मा.उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे रिट याचीका दाखल करुन आव्हान दिले. त्यानुसार

१. W.P. ७८४३/१४ शाह इन्व्हेस्टमेंट विरुध्द मनपा

२. W.P. ८२११/१४ पॉलीकॅब प्रा. लि. विरुध्द मनपा

सदरील प्रकरणात निविदाधारक कं.मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम सोबत मनपा प्रतिवादी होती.

या दोन्ही याचींकांची एकत्रित सुनावणी होऊन दि. १४.१०.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाने निकाल दिला. त्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेने निविदा मंजुरी घाई घाईत केल्याने मनपाच्या निर्णयात हस्तक्षेपाची आवश्यकता असल्याने कारणमिमांसेसह नमुद करुन मा.स्थायी समितीने घेतलेला निर्णय आणि दि.०३/०९/२०१४ चा करारनामा व कार्यादेश रद्द करण्याचे आदेश पारीत केले.

दि.१४.१०.२०१४ रोजीच्या मा.उच्च न्यायालयाने दिलेला आदेश इलेक्ट्रॉन लाईटिंग सिस्टीमच्या विरोधात असल्यामुळे त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सदरील SLP No.३४१२९-३४१३०/२०१४ मध्ये सुनावणी घेऊन दि. २०/११/२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. त्यात इलेक्ट्रॉन लाईटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे अपील मा.सर्वोच्च न्यायालयाने अंशतः मंजुर केले.

या निर्णयाप्रमाणे दि.०३.०९.२०१४ रोजी केलेला करारनामा आणि कार्यादेश या अन्वये महानगरपालिकेने प्रदान केलेला पोलवर जाहिरात लावण्याचा अधिकार रद्दबातल केला असुन त्यासाठी पोलवरील जाहिरात ही निविदे व्यतिरिक्त बाब असल्यामुळे ती अट करारनाम्यातुन व कार्यादेशातुन वगळण्यात येत आहे असे निकालात मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे नमुद केलेले आहे. सदरील

निर्णयामुळे महानगरपालिका पोलवरील जाहिरातीसाठी (Kiosk) नव्याने निवीदा करण्यास मुक्त आहे. यावरुन असे निदर्शनास येते की दि. ०३.०९.२०१४ रोजी केलेला करारनामा आणि कार्यादेश हे जाहिरातीचे अधिकार वगळल्यामुळे नव्याने करणे योग्य राहील, ही कार्यवाही न्यायालयीन निर्णयानुसार अभिप्रेत आहे.

प्रकरणात नव्याने करारनामा, कार्यादेश देण्यापुर्वी प्रशासकीय निर्णयांचा संस्थेच्या आणि जनतेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने पुर्नअवलोकन करणे आवश्यक असल्याने संपुर्ण निविदे प्रक्रियेची आणि आर्थिक बाबींची तसेच न्यायालयीन निर्णयांच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, कार्य. अभियंता, विधी सल्लागार यांची समिती गठीत करण्यात आली. या समितीने निविदेच्या सर्व भागाची तपासणी करुन खालील प्रमाणे अहवाल दिला आहे. या अहवालानुसार सध्याच्या बाजारभावानुसार एल.ई.डी. स्ट्रीट लाईटची किंमत काढली आहे. **(सोबत तक्ता जोडला आहे.)**

| Sr. No | Code | Watts | Qty | Tender Amount | Amount As per Quoted Rate | Rate Collected From open Market (Bajaj Make) | Expected Expenditure as per Col.7 | Syska LED Quted Rate | Expected Expenditure as per Col.9 | Syska Led Watt | Saving of AMC as per open Market LED Current Rate | Saving of AMC as per Syska LED Current Rate |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12 (6-8)** | **13 (6-10)** |
| 1 | B 1 | 21 | 11800 | 15751 | 185861800 | 4775 | 56345000 | 3218 | 37972400 | 25 | 129516800 | 147889400 |
| 2 | B 2 | 31 | 8200 | 16513 | 135406600 | 8437 | 69183400 | 3903 | 32004600 | 40 | 66223200 | 103402000 |
| 3 | B | 50 | 7800 | 23935 | 186693000 | 9000 | 70200000 | 4523 | 35279400 | 50 | 116493000 | 151413600 |
| 4 | B 1 | 50 | 3200 | 23935 | 76592000 | 11812 | 37798400 | 8675 | 27760000 | 40 | 38793600 | 48832000 |
| 5 | B 1 | 75 | 8000 | 31358 | 250864000 | 12150 | 97200000 | 9914 | 79312000 | 60 | 153664000 | 171552000 |
| 6 | A 2 | 100 | 1000 | 33900 | 33900000 | 18000 | 18000000 | 14870 | 14870000 | 90 | 15900000 | 19030000 |
| | | | | **Total** | **869317400** | | **348726800** | | **227198400** | | **520590600** | **642119000** |

(१) सोबत जोडलेल्या सदर तक्त्यानुसार जर मनपाने नविन निविदा प्रसिध्द केली किंवा आपल्या स्तरावर उत्पादकाकडुन एल.ई.डी. स्ट्रीट लाईट खरेदी केल्यास निविदा दर व वर नमुद आजचे दर यामध्ये मनपाची अंदाजे ६०% ते ७०% पर्यंत बचत होऊ शकते.

(२) निविदा भाग-ब इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करणे ही बाब CSR रेटवर आधारीत आहे ती नविन निविदा मागविल्यास मनपाची २०% बचत होऊ शकते जी अंदाजे रु. ५.०० कोटी पर्यंत येते.

(३) निविदा भाग - क व ड हे केवळ निविदेत अंतर्भुत केलेले असुन त्याची आवश्यकता वाटत नाही, कारण LED खरेदीचा उद्देशच उर्जा बचतीचा आहे.

सद्य परिस्थितीत मे. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांना नव्याने करारनामा आणि कार्यादेश करुन देण्यात आलेला नाही. त्यांनी काम सुरु केलेले नाही. त्यामुळे त्यांची कोणतीही आर्थिक गुंतवणुक झालेली नाही. मनपाचे आर्थिक नुकसान होत असल्यास करारनामा करता येणार नाही. हा निर्णय व्यापक जनहितार्थ घेणे योग्य राहील. या निर्णयाने मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही, तथापि संबंधित पात्र निविदा धारक अरबीट्रेशन (Arbitration) लवादाकडे नुकसान भरपाईचा दावा दाखल करु शकतात, दावा दाखल झाल्यास तो चालविण्यासाठी मनपास लागणारा खर्च वरील नमुद नुकसानीपेक्षा तुलनेने खुपच कमी असेल त्याचप्रमाणे लवादासमोर मनपाची बाजु प्रभावीपणे मांडुन तो दावा निकाली काढता येईल कारण संबंधितांने अद्याप काम सुरु केलेले नाही आणि त्यांची कोणतीही आर्थिक गुंतवणुक झालेली नाही.

या पुढे आवश्यकता भासल्यास आणि मनपाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन मनपा स्तरावर LED खरेदी करुन उपलब्ध यंत्रणेमार्फत तसेच आवश्यकता भासल्यास कंत्राटदारामार्फत खरेदी/दुरुस्तीची कामे करण्यात येतील.

सदरचा प्रस्ताव मंजुर झाल्यास वरील नमुद परिस्थितीमुळे करारनामा/कार्यादेश देणे जनतेच्या हिताचे नसल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अवमान होण्याचे संभव नाही.
हे सर्वोच्च न्यायालयात निकाली निघालेल्या प्रकरणात दिवाणी अर्ज दाखल करुन निदर्शनास आणुन देता येईल आणि आदेशानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

वरील परिस्थिती विचारात घेता मे. इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. या संस्थेची निविदा शहरातील जनतेचे हित व मनपाचे आर्थिक हित जपणारी नाही असे वाटते, त्यामुळे मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे सोबत केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद:-</u>**

मा.आयुक्त :एलईडी टेंडरच एक विषय आहे. एलईडी दिवे बसविण्याचे ११०-११२ कोटीचे टेंडर केले होते. या टेंडरमध्ये जवळपास ८२ कोटीचे दिवे खरेदी करणार होतो व इतर काही पैसे देणार होते. या प्रकरणात जो हारलेला बिडर आहे त्याने लेटिकेशन हायकोर्टामध्ये केले होते. मा.हायकोर्टाने आपली वर्क ऑर्डर रद्य केली होती. जो सक्सेस फुल बिडर होता तो मा.सर्वोच्च न्यायालयात गेला. मा.सर्वोच्च न्यायालयाने ही ऑर्डर व्हेरीफाय करून वर्कऑर्डर योग्य ठरविली होती. आता या परिस्थितीमध्ये टेंडर करायचे की नाही? हा विषय होता. टेंडरची स्क्रूटनी केल्यानंतर ठाम मत झाले की हे टेंडर महापालिकेसाठी आर्थीक दृष्टया हिताचे नाही. त्यामुळे मी असा निर्णय घेतला की, माझ्या समोर दोन प्रश्न होते ते का हिताचे नाही की कमेटी केली कमेटीचा रिपोर्ट आला. एकतर ८२ कोटीचे दिवे खरेदी करणार आहे. त्याचे मार्केट रेट काढले त्या जवळपास एक तृतियांश आलेल्या आहे म्हणजे २५ ते ३५ कोटी पर्यत या दिव्याची जास्तीत जास्त कॉस्ट जाईल माहिती घेतल्यानुसार कदाचित टेंडर केल्यानंतर कमी जाईल. त्यास ८२ कोटी देण्यासाठी आयुक्त म्हणून माझी तयारी नाही.

हे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात गेलेले आहे. परंतु न्यायालयाने असे म्हटले की काही ॲडमिनीस्ट्रेटिव्ह डिसीजन्स् असतात त्याच्यात ज्युडिशीअरी रिव्ह्यु शक्यतोवर घेऊ नये. कारण ही गोष्ट स्वस्त आहे, महाग आहे, चांगली आहे, वाईट आहे हे प्रशासनाला माहित असते. प्रशासनाला जास्त कळते असे मा.न्यायालयाने म्हटले आहे. या संदर्भात वकीलांचा सल्ला घेतला आहे. निवृत्त न्यायाधिशाचा सल्ला घेतला. माझ्या मते यात कन्टेम ऑफ कोर्ट होत नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाने ही ऑर्डर योग्य एवढे ठरवलेले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने स्पेसिफिक डायरेक्शन्स् दिले नाही की, हे करा का ते करा. हा आपला व कॉन्ट्रॅक्टर मधील विषय आहे. आपला निर्णय झाल्यानंतर मी हा करार डायरेक्ट कॅन्सल करणार नाही. मा.सर्वोच्च न्यायालया समोर पुन्हा मी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणार आहे की त्यावेळेस परिस्थिती अशी होती व्हॅलिडेट केले आहे, परंतु प्रशासकीय दृष्टया बरोबर वाटत नाही. यात मनपाचा

लॉस आहे एवढा मोठा लॉस करून २०-२५ कोटीचे काम ८२ कोटीत करणे किंवा ३० कोटीचे काम ११० कोटीत करणार प्रशासक म्हणून मी त्यास संमती देऊ शकत नाही. याउपर मा.सर्वोच्च न्यायालय जे काही आदेश देईल ते आपल्यावर बंधनकारक असेल. राहिला प्रश्न डॅमेजेसचा. डॅमेजेसचा क्लेम होणार पण आजपर्यंत काम सुरू झालेले नाही. आमच्या समोर कंपनीने एक रूपया खर्च केल्याचा कुठलाही पत्रव्यवहार नाही. त्यांची मागणी अशी की पुन्हा रिवाईज वर्क ऑर्डर दया ती आपण दिली नाही याचा अर्थ कामाचा प्रश्न नाही. डॅमेजेसचा छोटा मोठा क्लेम होईल त्यामुळे आपण जर रुपये ७०/८० कोटी साठी मनपाला २ कोटी रुपये महिन्याला द्यावे लागतील. या टेंडर मधील फॉल्टीनेस अजून सांगतो की, एका एलईडी लाईटचे लाइफ ५० वर्ष हा व्यक्ती आठ वर्ष मेन्टनन्स करणार १२ तास गुणे ३६५ दिवस X ८ प्रमाणे दिवे ३५ हजार तास चालणार. खरे दिव्याचे लाइफ ६० हजार तास पुढचे ८,९,१० वर्षाला ९५ रू प्रति पोल प्रति महिना देणार. हे जी लाईफ देणार आहे. दुसरा मुद्दा निघाला की बील वाढेल. आता ३७ लक्ष बील महिना भरतो. त्यावर बील वाढले तर कंपनी भरणार. साधी बाब की एलईडी बसविल्यानंतर बील कमी येते. १५-१६ लक्ष येईल हे मला प्रशासक म्हणून मान्य नाही. मी यास पार्टी होणार नाही. दुसरा हे दुस-याकडून दोन कोटी रूपये महिन्याला घेण्याचे सुरू होईल. माझे स्ट्रॉंग रिकमन्डेशन आहे. माझ्या मते कन्टेम होत नाही. कन्टेम झाला तर माझ्यावर होईल. तरी मी फेस करण्यास तयार आहे. मला प्रॉब्लेम नाही. मी याला पार्टी होऊ शकत नाही.

मा.उपमहापौर :संबधीत ठेकेदाराने किती खर्च केलेला आहे.

शहर अभियंता :त्यांनी रिवाईज ऑर्डरची मागणी केली ती दिलेली नाही त्यामूळे खर्च करयाचा प्रश्नच येत नाही.

मा.महापौर :मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. प्रस्तावासोबत जोडलेल्या अहवालानुसार व तक्त्यानुसार जर मनपाने नवीन निवीदा प्रसिध्द केली किंवा आपल्या स्तरावर उत्पादकाकडून एल.ई.डी.स्ट्रीट लाईट खरेदी केल्यास निवीदा दर व प्रस्तावात नमुद आजचे दर यामध्ये मनपाचे अंदाजे ६० टक्के ते ७० टक्के पर्यंत बचत होऊ शकते. सध्याच्या बाजारभावानुसार एल.ई.डी. बल्बची व सिस्का एल.ई.डी.बल्बची किंमत यामध्ये फार मोठी तफावत आहे. व्यापक जनहित व मनपाचे आर्थिक हित लक्षात घेता मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे सोबत यापूर्वी केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्द करण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची दक्षता घेऊन तसेच बाजार भावातील एल.ई.डी. बल्बच्या कमी झालेल्या किंमती या संदर्भात मा.आयुक्तांनी प्रशासनाच्या वतीने सविस्तर खुलासा केल्यानुसार व व्यापक जनहित लक्षात घेता व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन मे.इलेक्ट्रॉन लायटिंग सिस्टीम प्रा.लि. यांचे सोबत

यापूर्वी केलेला करारनामा व त्यांना दिलेले कार्यादेश रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने सदरील प्रकरणात नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३४१:-**

मा. आयुक्त महोदय यांची मान्यता व आदेशानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. प्रधानमंत्री महोदय यांच्या सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नागरी भागांकरीता प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली आहे. केंद्र शासनाने सदर योजना ही विशेषरित्या नागरी क्षेत्राकरीता लागू केली असुन त्याअनुषंगाने सदर योजना राज्यातील नागरी स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात लागु करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक प्रआयो.२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल), दिनांक ०९ डिसेंबर २०१५ निर्णय घेतलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील चार घटक समाविष्ट आहेत.

१) जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडट्टयांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे.

२) कर्ज सलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातुन आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.

३) खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.

४) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांद्वारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान.

वरीलपैकी घटक क्र. २ हा कर्ज संलग्न व्याजावरील अनुदानासंबंधी असुन या घटकाची अंमलबजावणी या आदेशाच्या दिनांकापासुन राज्यातील सर्व शहरांमध्ये लागु करण्यात आली आहे.

घरकुलाचे किमान आकारमान नॅशनल बिल्डिंग कोड (NBC) ने पुरविलेल्या मानकांप्रमाणे असेल, तथापी जमीनीचे क्षेत्र पुरेसे नसेल तर लाभार्थ्यांच्या संमतीने राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या मान्यतेने कमी क्षेत्रफळाची घरे बांधता येतील. असे करतांना घरामध्ये शौचालय सुविधा आवश्यक राहील.

→ अभियानांतर्गत बांधण्यात येणारी घरे ही कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि कर्ती महिला सदस्य नसेल त्या ठिकाणी कर्ता पुरुषांच्या नावे घर राहील.

→ अभियानांतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांची सहकारी संस्था स्थापन करण्यास प्राधान्य देण्यात यावे/लाभधारकांना सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी प्रात्साहित करावे.

→ लाभार्थी कुटुंबामध्ये पति-पत्नी व अविवाहित मुले (Children) यांचा समावेश असेल. या अभियानांतर्गत केंद्राकडून अनुदान/सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरीता, देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे.

→ या योजने अंतर्गत लाभार्थ्यांची पातत्रा प्रधानमंत्री आवास योजना, “सर्वांसाठी घरे” (नागरी) च्या मार्गदर्शक सूचनानुसार राहील.

प्रस्तुत योजना अभियान स्वरुपात (कर्ज संलग्न व्याज सबसिडी घटक वगळता) केंद्र पुरस्कृत योजना म्हणुन राबविण्यात येणार आहे.

५.अभियानाच्या घटकांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती :-

नमुद केलेले अभियानातील चार घटक पुढील कार्यपध्दतीने राबविण्यात येईल.

(अ) जमीनीचा साधनसंपत्ती म्हणुन वापर करुन त्यावरील झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे :-

या घटकामध्ये जमिनीचा वापर साधनसंपत्ती म्हणुन करुन झोपड्यांचा विकास करणे अपेक्षित आहे. राज्यात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अंतर्गत याच तत्वावर मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपुर व ठाणे येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे. या योजना

स्वयंसहाय्यित आहेत. ज्या नागरी स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदी नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापित करुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे व भविष्यात ज्या नागरी स्वराज्य संस्थेच्या कार्यकक्षेत ही योजना नव्याने लागु केली जाईल त्या सर्व ठिकाणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या तरतुदी नुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA Scheme) यापुढेही राबविली जाईल त्या शहराबाबतीत घटक क्रमांक-१ साठी केंद्र किंवा राज्य शासनाचा हिस्सा अनुज्ञेय राहणार नाही. या व्यतिरिक्त नागरी स्वराज्य संस्थांमध्ये या योजनेखाली केंद्र शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त राज्य शासनाचे अनुदान म्हणुन रुपये १.०० लक्ष प्रती घरकुल इतके अनुदान अनुज्ञेय राहील. केंद्र शासनाच्या "सर्वांसाठी घरे-२०२२" या अभियानामधील घटकांसाठी निश्चित केलेली कार्यपध्दती व शासन निर्णयात नमुद राज्य शासनाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार या संदर्भातील प्रस्ताव करणे प्रत्येक प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेस बंधनकारक राहील. सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा नागरी स्वराज्य संस्था तयार करतील व नमुद केलेल्या मुख्य सचिवांच्या अध्यतेखाली राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील. सर्वेक्षणांती झोपडपट्ट्यांच्या विकासाकरीता तयार करण्यात येणारी प्रकल्प वर्धनक्षम होण्यासाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असणाऱ्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावली/ तरतुदी/अधिनियमामध्ये बदल करणे आवश्यक असल्यास असे बदल करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमामधील तरतुदीनुसार कार्यवाही करुन मान्य करुन घेण्याची जबाबदारी संबंधित नागरी स्वराज्य संस्थांची राहील. राज्यस्तरीय मान्यता व सनियंत्रण समितीस राज्य शासनाने मंजुर केलेल्या प्रती घरकुल राज्यांच्या हिश्यांमध्ये प्रकल्पाच्या सुसहाय्यतेसाठी २५ टक्के पर्यंत बदल करण्याचे अधिकार राहतील.

(ब) कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातुन आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे ही योजना राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात राबविण्यात येईल :-

सदर घटकांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना कर्ज सलग्न व्याज अनुदान योजना घरकुलांच्या निर्मितीकरीता व संपादनाकरीता असुन यामध्ये कमी व्याज दरावर १५ वर्षाकरीता विवक्षित बँका/गृहनिर्माण वित्तीय कंपन्या व इतर संस्था उपलब्ध करण्यात येईल. व्याजाच्या अनुदानाचा दर रुपये ६.०० लक्ष पर्यंत ६.५० टक्के इतका राहणार असुन १५ वर्षाचा कालावधी लक्षात घेऊन सदर व्याज अनुदानाची सध्याची किंमत (Net Present Value) संबंधित बँकांकडे केंद्र शासकीय यंत्रणांमार्फत थेट जमा करण्यात येणार आहे. सदर अनुदानासह असणाऱ्या कर्जाची कमाल मर्यादा रुपये ६.०० लक्ष इतकी असुन त्यापुढील कर्ज हे अनुदान विरहीत असेल.

सदर घटकांचे सनियंत्रण व आढावा हा केंद्र शासनाद्वारे घेण्यात येईल. ही योजना केंद्र शासनाच्या धोरणानुसार बँकामार्फत राबविण्यात येईल. राज्यस्तरावर समन्वयाचे काम स्टेट लेवल बँकर्स कमिटी व जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बँकर्स समिती त्या-त्या जिल्ह्यातील घटक क्रमांक-२ मधील योजनांची अंमलबजावणीचे संनियंत्रण करतील. राज्यस्तरीय बँकर्स समिती व जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीत सदर योजनाचा अंमलबजावणीचा आढावा नियमितपणे घेण्यात यावा असे शासनाचे आदेश आहेत.

(क) भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती :-

सदर घटकांतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींकरीता शासकीय यंत्रणा व खाजगी संस्थाशी भागीदारी करुन घरकुलांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकल्पांकरीता केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष प्रति घरकुल इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या घटकांखाली ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतचे घरकुले अनुज्ञेय आहे. या घटकांखाली राज्य शासनामार्फत प्रति घरकुल रुपये १.०० लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. या घटकांतर्गत सादर करण्यात येणाऱ्या प्रकल्पांमध्ये किमान २५० घरकुले असणे आवश्यक असुन यातील किमान ३५ टक्के आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असणे आवश्यक आहे. या प्रकल्पासाठी खाजगी तसेच शासकीय/निमशासकीय संस्था स्वतंत्रपणे देखील सहभागी होऊ शकतील.

सदर योजनेखाली घरकुलांचे क्षेत्रफळ/किंमत इत्यादी बाबी निश्चित करण्याचे अधिकार राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती राहतील.

या घटकांखाली प्राप्त प्रकल्पांना राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती व केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती यांचे मान्यतेने राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(ड) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना व्यक्तिगत घरकुल बांधण्यास अनुदान :-

आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील पात्र कुटुंबांना त्यांच्या स्वत:च्या मालकीच्या जागेवर नविन घरकुल बांधण्यास अथवा राहत्या घराची वाढ करण्यास केंद्र शासनाकडून रुपये १.५० लक्ष पर्यंत अनुदान उपलब्ध करण्यात येईल. परंतु अशा लाभार्थ्यांचा समावेश सर्वांसाठी घरे कृती आराखड्यात असणे आवश्यक आहे. या घटकांखालील राज्य शासनाचे अनुदान रुपये १.०० लक्ष पर्यंत राहील. अनुदानाची रक्कम राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती मान्य करील. पात्र लाभार्थ्यांचा प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह नागरी स्वराज्य संस्थांकडे सादर केल्यानंतर नागरी स्वराज्य संस्थांद्वारे योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छाननी केली जाईल व लाभार्थ्यांची आर्थिक क्षमता विचारात घेऊन शहर विकास आराखड्याशी अथवा सर्वांसाठी घरे कृती आराखड्याशी सुसंगत असणारे प्रस्ताव एकत्र करुन राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीसमोर मान्यतेसाठी सादर करतील.

६. लाभार्थ्यांच्या निवडी बाबत सर्वसाधारण अटी :-

१) घटक क्र.१ साठी लाभार्थी म्हणून पात्रता महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील तरतुदीनुसार राहील.

२) गृहनिर्माण विभागाच्या दि.२४.३.२०१४ च्या शासन निर्णयानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील व्यक्तीकरिता आर्थिक उत्पन्नाची मर्यादा निश्चित केलेल्या आहेत. या केंद्र शासनाव्दारे या योजनेमध्ये विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी आहेत. राज्य शासनाव्दारे निश्चित केलेल्या मर्यादेशी केंद्र शासनाचा समतोल आणण्याची आवश्यकता लक्षात घेऊन केंद्र शासनाने विहित केलेल्या आर्थिक मर्यादेपर्यंत राज्य शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेत खालीलप्रमाणे वाढ करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

| **गट** | **प्रतिवर्ष आर्थिक मर्यादा (रुपयामध्ये)** | | |
|---|---|---|---|
| | केंद्र | राज्य | राज्यासाठी सुधारीत आर्थिक मर्यादा |
| आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थी | रु.३,००,०००/- पर्यंत | रु.१,८०,०००/- (अल्प उत्पन्न गट) पर्यंत | रु.३,००,०००/- पर्यंत |
| अल्प उत्पन्न गटातील लाभार्थी | रु.३,००,००१/- ते रु.६,००,०००/- पर्यंत | रु.१,८०,००१/- ते रु.४,८०,०००/- पर्यंत | रु.३,००,००१/- ते रु.६,००,०००/- पर्यंत. |

घटक क्र.१ व्यतिरिक्त इतर घटकांसाठी पात्रता ही प्रधानमंत्री आवास योजना, सर्वांसाठी घरे (नागरी) च्या मार्गदर्शक सुचनांनुसार राहिल.

७. राज्यस्तरीय मंजूरी व संनियंत्रण समिती :-

सर्वांसाठी घरे या अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे काही फेरफारासह राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खाली नमुद केलेल्या राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समिती गठित करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

| अ.क्र | सदस्यांचे पदनाम | |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (नवि-१) नगरविकास विभाग | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव (नवि-२) नगरविकास विभाग | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव/उपर मुख्य सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव/उपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव, महसुल व वन विभाग | सदस्य |
| ९. | (संयोजक) , स्टेट लेव्हल बँकर्स कमिटी | सदस्य |
| १०. | अभियान संचालक, सर्वांसाठी घरे अभियान | सदस्य सचिव |

समिती आवश्यक वाटेल त्या इतर विशेष अधिकारी/ तंज्ञांना निमंत्रित करु शकेल.

समितीच्या कार्यकक्षा व अधिकार

१. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अभियानाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.
२. सर्वांसाठी घरे कृती आराखडा मान्य करणे.
३. वार्षिक अंमलबजावणी आराखडयास मंजूरी देणे.
४. विविध घटकांतर्गत सादर होणाऱ्या तपशीलवार प्रकल्प प्रस्तावास मान्यता देणे.
५. वार्षिक गुणवत्ता संनियंत्रण आराखडयास मान्यता देणे.
६. राज्याव्दारे शहरांकरिता मान्य करण्यांत आलेल्या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा.
७. अभियानाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण.
८. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता उपस्थित अन्य बाबीबाबत निर्णय घेणे.

८. राज्य अभियान संचालनालय व राज्यस्तरीय तांत्रिक कक्ष :-

सदर अभियानाची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य अभियान संचालनालय स्थापन करण्यांत येत आहे. या अभियानांतर्गत राबविण्यांत येत असलेल्या राज्यातील सर्व प्रकल्पांवर देखरेख व संनियंत्रण या संचालनालयाचे असेल. या संचालनालयाच्या प्रमुख पदी धारावी पुनर्वसन प्रकल्प मुंबईच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची संचालक, राज्य अभियान संचालक म्हणून नियुक्ती करण्यांत येत आहे. अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केल्यानुसार राज्यस्तरीय तांत्रिक कक्षाकरीता खाली नमुद पदांची निर्मिती करण्यास व हे अभियान संचालनालयास उपलब्ध करुन देण्यांत मान्यता देण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ञ | २ पदे | मार्गदर्शक तत्वानुसार या पदांचे वेतनमान केंद्र शासनाकडून स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येणार असुन ती निश्चिती होईपर्यंत सध्या राजीव आवास योजनेतील मानकाप्रमाणे वेतन अनुज्ञेय ठरविण्यात येईल. |
| २ | बांधकाम तंत्रज्ञानी | १ पद | |
| ३ | सामाजिक विकास तज्ञ | १ पद | |
| ४ | नागरी नियोजन तज्ञ | १ पद | |
| ५ | माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ | २ पदे | |
| ६ | प्रकल्पाच्या आर्थिक मुल्यमापनासाठी तज्ञ | १ पद | |
| ७ | प्रशासकीय कामकाजासाठी सह/ उप संचालक | २ पदे | |
| | एकूण | १० | |

या करीता लागणारा निधी केंद्र शासन व राज्य शासन यांच्यात ७५:२५ या प्रमाणांत राहिल. हे कर्मचारी अभियान संचालकांच्या अधिपत्याखाली कार्यरत राहतील, या व्यतिरिक्त अभियान संचालनालयास आवश्यक सहाय्यक कर्मचारीवृंद विभागाच्या नियंत्रणाखालील संस्थांमधून उसनवारी तत्वावर उपलब्ध करुन घेण्यांत येईल. वरील पदनिर्मितीस केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

संचालनालयाची कार्यकक्षा :-

१. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडे सादर करण्याकरीता राज्यातील सुकाणु अभिकरणांकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन असे प्रस्ताव राज्य शासनाच्या राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीसमोर सादर करणे व त्यास मान्यता प्राप्त करुन घेणे.

२. राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीव्दारे मान्य करण्यांत आलेल्या प्रस्तावानुसार केंद्र शासनाच्या केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीकडून अशा प्रकल्पांना निधी वितरीत करुन घेणे.

३. केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून प्राप्त होणा-या अनुदानाचे व्यवस्थापन करणे.

४. नागरी स्वराज्य संस्था/ राज्याशी इतर संलग्न संस्था यांना अनुदान वितरित करणे.

५. वितरीत केलेल्या अंमलबजावणी यंत्रणांकडून खर्च करण्यांत आलेल्या निधींचे उपयोगिता प्रमाणपत्र घेंऊन हप्त्याचे वितरण केंद्र शासनाकडून संमत करुन घेणे व अंमलबजावणी यंत्रणांना उपलब्ध करुन घेणे.

६. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या योजनेच्या प्रत्यक्ष कामावर व त्यांच्या आर्थिक प्रगतीवर जातीने लक्ष दणे.

७. संमती ज्ञापन करारानुसार राज्याने अनिवार्य अटींच्या पूर्ततेच्या अंमलबजावणी वर लक्ष ठेवणे.

८. राज्य शासनाव्दारे वेळोवेळी देण्यांत आलेल्या सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.

९. अभियानाच्या अंमलबजावणी संदर्भात शहरस्तरीय तांत्रिक कक्षास आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करणे.

१०. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता इतर काही संबंधित बाबी उपस्थित झाल्यास त्या विचारात घेण्यांत याव्यांत.

९. सुकाणू अभिकरण :-

या योजनेतील विविध घटकांतर्गत प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी करण्याकरीता सुकाणू अभिकरण म्हणून खालील संस्था असतील.

| अ.क्र. | घटकाचे नांव | कार्यक्षेत्र | संस्था |
|---|---|---|---|
| १ | घटक क्र.१ :- जमिनीचा साधनसंपत्ती म्हणून वापर करुन त्यावरील झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच पुनर्विकास करणे. | विविरणपत्र - अ मधील शहरे. | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. |
| २. | घटक क्र.२:- कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिकदृष्टया दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे. | संपूर्ण राज्यासाठी | राज्यस्तरीय बँकर्स समिती |
| ३ | घटक क्र.३ - भागीदारी तत्वावर परवडणारी घरे निर्माण करण्याचे प्रकल्प. | संपूर्ण राज्यासाठी | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. |
| ४ | घटक क्र.४ - वैयक्तीक घरकुल बांधण्याची प्रकल्प. | संपूर्ण राज्यासाठी | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण. |

१० शहरस्तरीय तांत्रिक कक्ष :-

या अभियानाअंतर्गत संबधित शहराकरीता मार्गदर्शक सूचनानुसार तज्ञांची (चार पर्यंत) नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. या नियुक्त्यांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मान्यता आवश्यक राहील. शहराच्या आकारमानानुसार शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील तंज्ञांच्या कमाल संख्येत वाढ करण्याचे अधिकार केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीस असतील. याबाबतचे प्रस्ताव राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीमार्फत केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीसमोर सादर करणे आवश्यक राहील. शहरस्तरीय तांत्रिक कक्षाचे प्रमुख हे नागरी स्वराज्य संस्थेचे प्रशासकिय प्रमुख यथास्थिती आयुक्त/मुख्य अधिकारी असतील. व या कक्षाचे प्रमुख कार्य हे शहराचा सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करणे व वार्षिक अंमलबजावणी आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे, हे असेल. सदर कक्षासाठी तज्ञांच्या पदावर कंत्राटी पध्दतीने अथवा प्रतिनियुक्तीने अथवा उसनवारी तत्वावर नेमणूका करण्यांत येतील. या कक्षाकरीता होणारा खर्च हा केंद्र शासन व राज्य शासनाच्या निधीतून ७५:२५ या प्रमाणात भागविण्यांत यावा. या प्रयोजनाकरीता लागणारा राज्य हिश्याचा निधी विभागाच्या उपलब्ध नियतव्ययातून उपलब्ध करुन घेण्यांत येईल.

११. प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा :-

| अ.क्र. | घटक | संस्था |
|---|---|---|
| १ | घटक क्र.१ | संबंधित झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व नागरी स्वराज्य संस्था. शिवशाही पुनवर्सन प्रकल्प मर्यादितच्या कार्यक्षेत्रामध्ये झोपडपट्टी प्राधीकरणाच्या सहमतीने. |
| २ | घटक क्र.२ | या अभियानाच्या मार्गदर्शक सुचनानुसार |
| ३ | घटक क्र.३ | नागरी स्वराज्यसंस्था, सिडको, म्हाडा, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प, पिंपरी चिंचवड नविन शहर विकास प्राधिकरण, नागपूर सुधार प्रण्यास व तत्सम शासकिय व निमशासकिय संस्था. |

| | | |
|---|---|---|
| ४ | घटक क्र.४ | संबंधित नागरी स्वराज्य संस्था. |

१२. प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती :-

या अभियानांतर्गत योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्पांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची राहील. अशा यंत्रणांनी सुकाणू अभिकरणामार्फत व अभियान संचालकामार्फत राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीला प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

नागरी स्वराज्य संस्थाद्वारे सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा तयार करण्याकरिता काही कालावधी लागणार असल्याने जे प्रस्ताव सहजरित्या या आराखडयांचा भाग होऊ शकतील असे प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा संबंधित सुकाणु अभिकरणांमार्फत अभियान संचालनालयास सादर करु शकतील. तथापि, याचा समावेश सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा मध्ये समाविष्ट करणे याची दक्षता घेण्याची जबाबदारी नागरी स्वराज्य संस्थांची राहील.

१३. केंद्र शासनाच्या केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती (CSMC) व्दारे मान्य करण्यांत आलेल्या प्रकल्पांच्या प्रभावी व कालबध्द अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी राज्य अभियान संचालकांच्या देखरेखीखाली प्रस्ताव सादर करणा-या संस्थांची राहील. नगरपालिका/नगरपरिषदेच्या प्रकल्पाबाबत ज्या ठिकाणी नगरपालिका/नगरपरिषदा प्रकल्प अंमलबजावणी करतात त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे आढावा घ्यावा.

१४. सवलती :-

अ- महसुल व वन विभाग यांचा शासन निर्णय क्र.जमिन २०१५/प्र.क्र.४५/ज-१ दिनांक १ जुन, २०१५ नुसार सदर योजनेकरिता जमिनीचा आगाऊ ताबा देण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील. यांजनेअंतर्गत विविक्षित प्रस्ताव सादर करतांना त्यातील अटी व शर्ती पूर्ण होतील याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणांची राहील.

ब - शासकिय जमिनीवरील झोपडयांच्या जागेवर घरे बांधणसाठी अकृषिक परवानगी व त्या संदर्भातील शुल्कामध्ये सवलती देण्यासंदर्भात महसुल व वन विभागाकडील निर्गमित आदेशातील कार्यपध्दतीप्रमाणे अनुज्ञेय राहील.

क - या योजनेतील घरांसाठी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी संदर्भात काही सवलती द्यावयाचे असल्यास या संदर्भात महसुल व वन विभागाकडून स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यांत येईल.

ड - कॅडेस्ट्रल सर्वेसाठीच्या फी मध्ये सवलत देण्यासंदर्भात आदेश महसुल व वन विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यांत येईल.

१५. सर्वेक्षण :-

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विहित केलेल्या नमुन्यामध्ये विविध घटकांतर्गत मागणीबाबतच्या सर्वेक्षणाची जबाबदारी खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | शहरे | सर्वेक्षण करणारी संस्था |
|---|---|---|
| १. | बृन्हमुंबई महानगरपालिका क्षेत्रात घटक क्र.१ साठी झोपडयांचे सर्वेक्षण. | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधीकरण, मुंबई. |
| २ | मुंबई महानगर प्रदेशातील इतर घटकांतर्गत मागणी निश्चित करण्यासाठी करावयाचे सर्वेक्षण. | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधीकरण. |
| ३ | वरील १ व २ व्यतिरिक्त. | संबंधित नागरी स्वराज्य सस्था. |

ज्या शहरांनी राजीव आवास योजनेअंतर्गत सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे अशा शहरांना सदर सर्वेक्षणास अनुलक्षून प्रस्ताव सादर करण्यास अनुमती दर्शविण्यांत येत आहे. नागरी स्वराज्य संस्थांनी सादर केलेल्या सर्वासाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा यातील विविध घटकांतर्गत गृहनिर्मितीचे प्रस्ताव सादर करतांना प्रकल्प वर्धनक्षम होण्याच्या दृष्टिने सद्यस्थितीतील अस्तित्वात असणाऱ्या तरतूदी/नियम/नियमावली/अधिनियम इ. मध्ये आवश्यक बदल करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१६. या योजनेसाठी होणारा खर्च केंद्र हिश्यासाठी मागणी क्रमांक ०३, मुख्य लेखाशिर्ष २२१६ गृहनिर्माण, १०३ गृहनिर्माण मंडळांना सहाय्यक अनुदाने (०८) (०१) सर्वांसाठी घरे अंमलबजावणी करणा-या संस्थांना अनुदाने, (केंद्र हिस्सा) (२२१६२९९६)आणि राज्य हिश्यासाठी मागणी क्रमांक ०३, मुख्य लेखा शिर्ष २२१६ गृहनिर्माण मंडळांना सहाय्यक अनुदाने, (०८) (०२) सर्वांसाठी घरे - अंमलबजावणी करणा-या संस्थांना अनुदाने, (राज्य हिस्सा) (२२१६३००७) या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

१७. हा शासन निर्णय नियोजन, वित्त, महसूल व नगरविकास विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन राज्य मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयान्वये निर्गमित करण्यांत येत आहे. करिता उपरोक्त दर्शविलेल्याप्रमाणे आवश्यकतेनुसार प्रस्तुत योजने अंतर्गत योजनेचा प्रकल्प विकास आराखडा तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे, निविदा कार्यवाही करणे आणि संबंधित सर्व कामे करणेसाठी पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करणेसाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.प्रधानमंत्री महोदय यांच्या सन-२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या संकल्पनेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने नागरी भागांकरीता प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली आहे. या योजनेच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०९ डिसेंबर-२०१५ नुसार सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात नमुद (१) ते (१७) बाबी अंतर्गत आवश्यकतेनुसार हि योजना राबविण्यासाठी योजनेचा प्रकल्प विकास आराखडा तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, नकाशे तयार करणे, निविदा कार्यवाही करणे आणि संबंधीत सर्व कामे करणेसाठी शासन निर्णयातील निर्देशानुसार तांत्रिक कक्षाची स्थापना करणे व पात्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यास नियमाप्रमाणे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३४२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन संदर्भाने शहरातील कचरा निर्मुलन होण्याच्या दृष्टिने जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्थेच्या मार्फत औरंगाबाद मनपास कचरा निर्मुलनासाठी अर्थसहाय्य हे सिव्हीक रिस्पॉन्स टिम या संस्थेस देत आहे. तसा करारनामा CII व CRT व JBGVS आणि महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मध्ये झालेला आहे. सोबत करारनाम्याची प्रत जोडली आहे.

सदर सिव्हीक रिस्पॉन्स टिम ही संस्था मनपाच्या स्वच्छतेकामात सतत मदत करीत आहे. तरी या संस्थेच्या मार्फत जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्थेकडून महानगरपालिकेच्या घनकचरा हाताळणी करीता १,६०,००,०००/- (रक्कम रुपये एक कोटी साठ लाख फक्त) महानगरपालिकेस मिळण्यास तसा प्रस्ताव मंजुर करून पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यास प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

मा.महापौर :विषय मंजुर.प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिव्हीक रिस्पॉन्स टिम या संस्थेच्या मार्फत जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्थेकडून महानगरपालिकेच्या घनकचरा हाताळणी करीता १,६०,००,०००/- (रक्कम रुपये एक

कोटी साठ लाख फक्त) महानगरपालिकेस मिळण्यास मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३४३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,मा. आयुक्त, यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासनाचे अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याचा धोरणात्मक निर्णय (शासन निर्णय क्रमांक नगर विकास विभाग-संकीर्ण-2015/प्र.क्र.68/नवि-16, मंत्रालय, मुंबई-32 दि. 15 सप्टेंबर 2015) घेतला आहे. त्या अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अल्पसंख्याक बहुल प्रभाग निश्चीत करणे, सदर प्रभागाअंतर्गत विकास कामे निश्चीत करणे व सदर कामांना प्रशासकीय मान्यता देणे बाबत समिती गठीत करण्यात आली आहे. ज्यामध्ये मा. विभागीय आयुक्त, अध्यक्ष, जिल्हाधिकारी, सदस्य आणि महानगरपालिका आयुक्त, सदस्य सचिव यांचा समावेश आहे. शासकीय निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिके करीता उक्त कामांसाठी रक्कम रु 2.00 कोटी अनुदान शासनाकडून प्राप्त झाल्याचे जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकेस कळविले आहे. सदर निधी मार्च 2016 अगोदर आहरीत न केल्यास हा निधी व्यापगत होणार आहे. करीता महानगरपालिकेमार्फत सदर निधी मधून खालील कामे प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (आकडे लाखात) |
|---|---|---|
| ०१. | दिल्लीगेट हिमायतबाग येथे औकाफचे मालकीच्या जागेवर सांस्कृतीक सभागृह बांधणे | ८०.०० |
| ०२. | वार्ड क्र ५८ बारी कॉलनी येथील परमवीर हमीद सभागृहाची दुरुस्ती करणे व परिसर विकसित करणे | २४.४८ |
| ०३. | आरेफ कॉलनी येथे रस्त्याचे क्रॉंक्रटीकरण करणे | २०.२० |
| ०४. | वार्ड क्र ४९ बुढ्ढीलाईन येथे नवीन गटार बांधणे | ०५.६७ |
| ०५. | वार्ड क्र १०८ हमालवाडा अंतर्गत शहाशौक्ता कॉलनी मधील अंतर्गत गल्ल्यातील जलनि:सारण वाहिनीचे काम करणे | ०४.९८ |
| ०६. | पंचशीलनगर येथे कॉक्रीटींग करणे | १९.७० |
| ०७. | पंचशीलनगर व नाथनगर या भागातील ड्रेनेज लाईन बदलणे | २४.९७ |
| ०८. | वार्ड क्र ४९ भडकलगेट अंतर्गत क्रॉंक्रीट रस्ता तयार करणे | १०.०० |
| ०९. | वार्ड क्र १०२ कबीरनगर मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे | १०.०० |
| | एकूण :- | २००.०० |

करीता वरील कामांना शासकीय निर्णयानुसार निधी उपलब्ध करुन देणे बाबत शिफारस करणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- ऐनवेळचा विषय मंजूर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचे अल्पसंख्याक विकास विभागाने राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याचा

धोरणात्मक निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिके करीता खाली नमुद केलेल्या कामांसाठी रक्कम रु 2.00 कोटी अनुदान शासनाकडून प्राप्त होण्याकरीता शिफारस करण्यात येते.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय |
|---|---|---|
| 01. | दिल्लीगेट हिमायतबाग येथे औकाफचे मालकीच्या जागेवर सांस्कृतीक सभागृह बांधणे | 80.00 |
| 02. | वार्ड क्र 58 बारी कॉलनी येथील परमवीर हमीद सभागृहाची दुरुस्ती करणे व परिसर विकसित करणे | 24.48 |
| 03. | आरेफ कॉलनी येथे रस्त्याचे क्रॉंक्रटीकरण करणे | 20.20 |
| 04. | वार्ड क्र 49 बुढ्ढीलाईन येथे नवीन गटार बांधणे | 05.67 |
| 05. | वार्ड क्र 108 हमालवाडा अंतर्गत शहाशौक्ता कॉलनी मधील अंतर्गत गल्ल्यातील जलनि:सारण वाहिनीचे काम करणे | 04.98 |
| 06. | पंचशीलनगर येथे कॉक्रीटींग करणे | 19.70 |
| 07. | पंचशीलनगर व नाथनगर या भागातील ड्रेनेज लाईन बदलणे | 24.97 |
| 08. | वार्ड क्र 49 भडकलगेट अंतर्गत क्रॉंक्रीट रस्ता तयार करणे | 10.00 |
| 09. | वार्ड क्र 102 कबीरनगर मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे | 10.00 |
| | एकूण :- | 200.00 |

प्रस्ताव सर्वानुमते मंजूर. वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्री.राहुल सोनवणे :डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मनपाच्या मुख्य इमारतीतील आवारामध्ये बसविण्याचा ठराव झाला.पाच वर्ष झाले आर्थीक तरतुद केली जावी.

मा.महापौर :या संदर्भात कार्यवाही करावी.

या बरोबर सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाब

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**(कार्यक्रम पत्रिका क्रमांक-१४)**

**शनिवार दिनांक २०.०२.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.पालिका सदस्य श्री.राजगौरव हरीदास वानखेडे (प्रभाग क्रमांक-०५)**

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद.**

**प्रश्न क्रमांक ३५६:-**

गुंठेवारी नियमीत करावयाचे नियमावली काय? गुंठेवारीची नियमावली देण्यात यावी.

**उत्तर:-**

महराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील कलम २ (क) ४ नुसार गुंठेवारी नियमितीकरण करण्यात येते. सोबत महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ ची प्रत देण्यात येत आहे.

**प्रश्न क्रमांक ३५७:-**

महानगरपालिका हद्दीत गेल्या पाच वर्षात किती वसाहती अथवा घरे गुंठेवारी अंतर्गत नियमीत करण्यात आलेत? त्याची माहिती देण्यात यावी. (प्रभाग निहाय माहिती प्रभाग अ ते फ).

**उत्तर:-**

गुंठेवारी अंतर्गत प्रभागनिहाय पुढील प्रकरण नियमित करण्यात आली आहेत.

| | | |
|---|---|---|
| अ | - | ७०० |
| ब | - | ५०६ |
| क | - | २६५ |
| ड | - | १९४ |
| ई | - | ३४४७ |
| फ | - | १०३५ |
| एकुण | - | ६१४७ |

**प्रश्न क्रमांक ३५८:-**

गुंठेवारी वसाहतींमध्ये मनपातर्फे कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून देता येतात? त्याची माहिती द्यावी.

**उत्तर:-**

महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम २००१ मधील कलम ६ नुसार विकास कामे केली जातात. सुलभ संदर्भासाठी अधिनियमातील तरतुदीची प्रत देण्यात आली आहे.

**नामनिर्देशित पालिका सदस्य श्री.घोडके कचरु छगनराव**

**प्रश्न क्रमांक ३५९:-**

दिनांक १८.१२.२०११ ते दिनांक ३१.०३.२०१५ या काळात कचरा संकलन व वाहतुकीसाठी प्रति वर्ष किती खर्च झाला? त्याची वर्ष निहाय माहिती द्यावी.

**उत्तर:- मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

दि. १८.१२.२०११ ते दि.३१.०३.२०१५ या काळात कचरा संकलन व वाहतुकीसाठी प्रतिवर्ष किती खर्च झाला, त्याची वर्ष निहाय माहिती बाबत खालील प्रमाणे विवरण देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कालावधी | झालेला खर्च |
|---|---|---|
| १. | दि. २२.१२.२०१ ते ३१.०३.२०१२ | रु. १,४७,५०,६५१/- |
| २. | सन २०१२-२०१३ | रु. ८,१४,६४,६८७/- |
| ३. | सन २०१३-२०१४ | रु. ७,७२,५१,१८३/- |
| ४. | सन २०१४-२०१५ | रु. ९,२९,३३,०५१/- |

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/ड),महानगरपालिका औरंगाबाद.**

- दिनांक १८.१२.२०११ ते दिनांक ३१.०३.२०१२ या कालावधीत महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये १४ लक्ष, इंधनासाठी रुपये ३८ लक्ष आणि खाजगी वाहनांच्या किरायासाठी रुपये ९८ लक्ष खर्च झालेला आहे.
- सन २०१२-१३ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ५६.६५ लक्ष इंधनखर्चासाठी रुपये १३०.५६ लक्ष व खाजगी वाहनांच्या किरायासाठी रुपये २०९.९३ लक्ष खर्च झाला आहे.
- सन २०१३-१४ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ८१.४० लक्ष, इंधनखर्चासाठी रुपये २०३.५० लक्ष व खाजगी वाहनांच्या किरायापोटी रुपये ३४०.५७ लक्ष खर्च झाला आहे.
- सन २०१४-१५ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ६८.५२ लक्ष, इंधनखर्चासाठी रुपये १९४.७६ लक्ष आणि खाजगी वाहनांच्या किरायासाठी रुपये ४०१.२८ लक्ष खर्च झाला आहे.

**प्रश्न क्रमांक ३६० ते ३६३:-**

**प्रश्न क्रमांक ३६०:-**

या काळात मनपाचे किती कर्मचारी संकलनासाठी (कचरा) नियुक्त केले होते? त्याची माहिती द्यावी तसेच या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर प्रतिमहा किती खर्च झाला? त्याची वर्ष निहाय माहिती द्यावी.

**उत्तर:- घनकचरा व्यवस्थापन कक्ष,महानगरपालिका औरंगाबाद.**

| स.नगरसेवक यांनी विचारलेले प्रश्न | कालावधी | कंत्राटी मजूर | एकूण खर्च | कालावधी | बचतगट मजूर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्र. ३६० दिनांक १८/१२/२०११ ते ३१/०३/२०१५ या काळात मनपाचे किती कर्मचारी कचरा संकलनासाठी नियुक्त केले होते ? त्याची माहिती दयावी ते कर्मचा-यांच्या वेतनावर प्रतिमाह किती खर्च झाला त्याची वर्षनिहाय माहिती दयावी | २४/०२/२०१२ ते ३१/०३/२०१२ | एकूण १२० मजूर २९९/-प्रतिदिन प्रतिमजूर | २,१५,२८८/- | १८/१२/२०१२ ते ३१/०३/२०१३ | एकूण ३२७ मजूर रु. २३३/- प्रतिदिन प्रतिमजूर | ६७,८०,९९९/- |
| | ०१/०४/२०१२ ते ३१/०३/२०१३ | | ९,३२,८८०/- | ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ | एकूण ३२७ मजूर रु. २३३/- प्रतिदिन प्रतिमजूर | २,३७,७१,५९२/- |
| | ०१/०४/२०१३ ते १५/०४/२०१३ | | ४,३०,५६०/- | ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ | एकूण ३२७ मजूर रु. २३३/- प्रतिदिन प्रतिमजूर | २,३७,७१,५९२/- |
| | १६/०४/२०१३ ते ३१/०५/२०१३ | कर्यादेश नाही | | ०१/०४/२०१५ ते ३१/०१/२०१६ | एकूण ३२७ मजूर रु. २६६/- प्रतिदिन प्रतिमजूर | २,२३,६०,२ ६०/- |
| | ०१/०६/२०१३ ते ३१/०३/२०१४ | | ९३,२८,८००/- | | | |
| | ०१/०४/२०१४ ते ३१/१०/२०१४ | | ६५,३०,१६०/- | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ०१/११/२०१४ ते ३१/०१/२०१५ | कर्यादेश नाही | | | | |
| | ०२/०२/२०१५ ते ३१/०३/२०१५ | | १८,६५,७६०/- | | | |
| | ०१/०४/२०१५ ते ३१/१०/२०१५ | कर्यादेश नाही | | | | |
| | ०२/११/२०१५ ते ३०/११/२०१५ | | ९,३२,८८०/- | | | |
| | | एकूण | २,०२,३३,३२८/- | | | ७,६६,८४,४४३ |

**कंत्राटी मजुर - २,०२,३३,३२८ ००**
**७,६६,८४,४४३ ००**
**------------------------**
**९,६९,१७,७७१ ००**
**------------------------**

**<u>प्रश्न क्रमांक ३६१:-</u>**

मनपाने कचरा संकलनासाठी उपरोक्त काळात किती वाहने वापरली? त्या वाहनांवर इंधनाचा खर्च किती आला? किती वाहने भाडे तत्वावर घेतली? त्याचा खर्च किती आला? किती वाहन चालक नियुक्त केले? त्यांची संख्या व प्रतिमहा वेतनावरील खर्च किती आला त्याची माहिती देण्यात यावी. तसेच खाजगी कर्मचारी किती नियुक्त केले? त्यांचा वेतनाचा खर्च किती झाला? याची प्रतिमहा व वर्ष माहिती द्यावी.

**<u>उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/ड),महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

- दिनांक १८.१२.२०११ ते दिनांक ३१.०३.२०१२ या कालावधीत महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत २८ ट्रक/टिप्पर्स व ४ जेसीबी वाहनांच्या इंधनासाठी रुपये ३८ लक्ष खर्च झाला आहे. या कालावधीत १८ टिप्पर्स, १३ ट्रॅक्टर्स व ०५ जेसीबी मशिन किरायाने घेण्यात आले होते. या खाजगी वाहनांच्या किरायासाठी रुपये ९८ लक्ष खर्च झालेला आहे.
- सन २०१२-१३ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत ८१ मनपा वाहनांच्या इंधन खर्चासाठी रुपये १३०.५६ लक्ष खर्च झाला आहे. या कालावधीत २० टिप्पर्स, १० ट्रॅक्टर्स या खाजगी वाहनांच्या किरायासाठी रुपये २०९.९३ लक्ष खर्च झाला आहे. सन २०१२-१३ मध्ये घनकचऱ्याच्या वाहनांसाठी ४० कंत्राटी वाहनचालक घेण्यात आले. या कंत्राटी वाहनचालकांच्या वेतनापोटी रुपये २३.८३ लक्ष खर्च झाला आहे.
- सन २०१३-१४ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत मनपाच्या १०२ वाहनांच्या इंधन खर्चासाठी रुपये २०३.५० लक्ष खर्च झाला आहे. या कालावधीत ११ टिप्पर्स, २० ट्रॅक्टर्स व २० लोडींग ॲटो ही खाजगी वाहने किरायाने घेण्यात आली होती. खाजगी वाहनांच्या किरायपोटी रुपये ३४०.५७ लक्ष खर्च झाला आहे. सन २०१३-१४ या वर्षात घनकचऱ्याच्या वाहनांसाठी ६० कंत्राटी वाहनचालक कार्यरत होते. या वाहनचालकांच्या वेतनापोटी रुपये ६९.३७ लक्ष खर्च झाला आहे.
- सन २०१४-२०१५ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या १०२ वाहनांच्या इंधन खर्चासाठी रुपये १९४.७६ लक्ष खर्च झाला आहे. या कालावधीत ११ टिप्पर्स, २० ट्रॅक्टर्स व ४९ लोडींग ॲटो ही खाजगी वाहने किरायाने घेण्यात आली होती. आणि खाजगी वाहनांच्या किरायासाठी रुपये ४०१.२८ लक्ष खर्च झाला आहे. या कालावधीत ६८ कंत्राटी वाहनचालक कार्यरत होते. व कंत्राटी वाहनचालकांच्या वेतनपोटी रुपये ६९.८४ लक्ष खर्च झाला आहे.

**प्रश्न क्रमांक ३६२:-**

मनपाने दिनांक ०१.०१.२०१२ ते दिनांक ३१.०३.२०१५ या काळात कचरा संकलनासाठी खरेदी केलेल्या वाहनांची संख्या व त्यावर झालेला खर्च याची माहिती द्यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/ड),महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिकेने दिनांक १.१.२०१५ ते दि.३१.३.२०१५ या कालावधीत खालील प्रमाणे वाहने खरेदी केलेली आहेत.

१. ॲटोटिप्पर्स - ४० नग
२. स्कीपलोडर्स - ०६ नग
३. हुकलोडर्स - ०७ नग
४. हायड्रोलिक हॉपर्स - १८ नग
५. ट्रॅक्टर लोडर्स - ०३ नग

वरील वाहनांच्या खरेदीसाठी रुपये ५७३.१३ लक्ष खर्च झाला आहे.

**प्रश्न क्रमांक ३६३:-**

दिनांक ०१.१०.२०११ ते ३१.०३.२०१५ पर्यंत कचरा संकलनासाठी असलेल्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीवर किती खर्च झाला? त्याची प्रतिमहा खर्चाची माहिती द्यावी. तसेच या काळात घनकचरा प्रमुख पदाची जबाबदारी कोणकोणत्या अधिकाऱ्यांना देण्यात आली? त्यांचे नाव व कार्यकाळ याची माहिती द्यावी.

**उत्तर:- कार्यकारी अभियंता (अ/ड),महानगरपालिका औरंगाबाद.**

- दिनांक १.१०.२०११ ते दिनांक ३१.३.२०१५ या कालावधीत महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी कार्यरत वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये २० लक्ष खर्च झालेला आहे. प्रतिमाह सरासरी खर्च रुपये ३.३३ लक्ष.
- सन २०१२-१३ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ५६.६५ लक्ष खर्च झाला आहे. प्रतिमाह सरासरी खर्च रुपये ४.७२ लक्ष.
- सन २०१३-१४ या वर्षात घनकचरा व्यवस्थानाच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ८१.४० लक्ष खर्च झाला आहे. प्रतिमाह सरासरी खर्च रुपये ६.७८ लक्ष.
- सन २०१४-१५ या वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रुपये ६८.५२ लक्ष खर्च झाला आहे. प्रतिमाह सरासरी खर्च रुपये ५.७१ लक्ष.

**स.पालिका सदस्य श्री.ढगे गंगाधर नामदेव (प्रभाग क्रमांक-४९):-**

**प्रश्न क्रमांक ३६४:-**

नैसर्गिक नदी,नाले प्रवाह मध्ये नगर रचना विभागामार्फत बांधकाम परवानगी देण्यात येते का? नक्षत्रवाडी गट क्र.०१ पैकी भु.क्र.-५४ व ५५ या ठिकाणी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे का? परवानगी देतांना नैसर्गिक नदी, नाल्याचा प्रवाहाचा अभ्यास नगररचना विभागामार्फत अभ्यास करण्यात आला होता का? सदरील बांधकाम परवानगी कोणाच्या अधिकाराखाली देण्यात आली. या बाबींचा सर्व सविस्तर तपशील सत्य प्रतींसह मिळणे बाबत.

**उत्तर:- सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद.**

नैसर्गिक नदी,नाले प्रवाह मध्ये परवानगी देण्यात येत नाही गट क्र.०१ पैकी भु.क्र.५४ व ५५ या भुखंडावर श्री.मुरलीवाला बिल्डर्स तफेर भागीदार श्री.मुरलीधर आनंदीलाल शर्मा व इतर या नावाने बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. सदरील बांधकाम परवानगी म.प्रा.नि.व. न.र.अधि.१९६६ च्या तरतुदी अन्वये देण्यात आलेला आहे. मंजुर विकास योजना नकाशानुसार सदरील ठिकाणी नाला प्रवाह दर्शविण्यात आलेला नाही. तसेच उप अधीक्षक भुमि अभिलेख, औरंगाबाद यांच्या मोर/१०१५/१३ मोजणी दिनांक ०५.१२.२०१३ च्या मोजणी नकाशामध्ये सुध्दा नाला

दर्शविण्यात आलेला नाही. परंतु भूखंड लगत ओहळ असल्याचे निदर्शनास आल्याने त्या बाबत बांधकाम परवानगी आदेशामध्ये “मा.कार्यकारी अभियंता, मनपा यांच्या मार्गदर्शनाखाली नाला संरक्षण भिंत बांधण्यात यावी.” अशी स्पष्ट अट नमुद करण्यात आलेली आहे व नकाशावरही तसे दर्शविण्यात आले आहे, व त्यास मा.आयुक्त महोदय यांची मान्यता आहे.

**प्रश्न क्रमांक ३६५:-**

पैठण रोडवर असलेल्या विटखेडा कांचनवाडी येथिल Best Price मॉलला एका वर्षाकरीता किती मालमत्ता कर आकारला जातो. सध्या मॉलकडे किती मालमत्ता कराची थकबाकी आहे व मॉल सुरू झाल्यापासून किती मालमत्ता कर भरला आहे.

**उत्तर:- उपआयुक्त तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका औरंगाबाद.**

१) पैठण रोडवरील बेस्ट प्राईज (Best Prise) या मॉल ला रु.६,७२,७८२/- प्रतिवर्ष कर आकारण्यात आला आहे.
२) सध्या मॉल कडे चालु वर्षातील रु.६८,१८२/- थकबाकी आहे.
३) मॉल सुरु झाल्यापासुन दि.०१.११.२०११ पासुन कराचा भरणा करत आहेत.

**प्रश्न क्रमांक ३६६:-**

औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या किती मोठे-मोठे किती जाहिरात फलक (होर्डींग) आहेत, यातुन महानगरपालिकेला दरवर्षी किती उत्पन्न मिळते?

**उत्तर:- उपआयुक्त (मालमत्ता), महानगरपालिका औरंगाबाद.**

औरंगाबाद शहरात महापालिकेच्या हद्दीत खाजगी एजन्सी धारकांना विविध ठिकाणी खाजगी जागेत/ ईमारतीवर एकुण ३४९ होर्डींग साठी परवानगी देण्यात आली होती. त्यामधुन काही होर्डींग रस्ता रुंदीकरणात निघालेल्या असुन व काही एजन्सी धारकानी होर्डींग काढून घेतलेले असल्याने सध्या स्थितीत शहरातील ३२६ होर्डींगपासुन महापालिकेस वार्षिक उत्पन्न रु.९८,६१,४२७/- ऐवढे होत आहे.

**स.पालिका सदस्या श्रीमती खान सायरा बानो अजमल (प्रभाग क्रमांक-२३)**

**प्रश्न क्रमांक ३६७:-**

मांडकी येथील कचरा डेपोसाठी असलेल्या जागेपैकी खताच्या कारखान्यासाठी देण्यात आलेली जागा बी.ओ.टी.वर दिली होती तो प्रकल्प बंद झाला. महानगरपालिकेने दिलेली संबंधीत जागा बी.ओ.टी. धारकाने बँकेकडे तारण ठेवली होती. सदरची जागा आजपर्यंत तारणमुक्त झालेली आहे किंवा नाही? याचा तपशील द्यावा.

**उत्तर:-घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख, महानगरपालिका औरंगाबाद.**

मे.सत्यम बायोफर्टीलायझर यांच्यासोबत मनपाच्या मालकीच्या गट नंबर ७८७९ मांडकी, नारेगांव ट्रेंचिग ग्राऊंट येथील ६ हेक्टर जागा घनकचरापासुन खतनिर्मितीसाठी दिनांक ०४.०७.१९९७ च्या लिज डीड द्वारे दि.२०.०३.१९९७ रोजी करार करुन प्रकल्पासाठी दिली आहे.

मे.सत्यम यांनी कराराचे उल्लंघन केल्याने दि.१८.०७.२००३ रोजी अंतिम नोटीस देवून करारनामा रद्द कला त्या अंतर्गत मनपाने जागा ताब्यात घेवून दि.१३.११.२००३ रोजी पंचनामा केलेला आहे.

मा.न्यायालयाने मनपाच्या बाजुने निकाल दिलेला असुन मे.सत्यमची मागणी लवादाचा निर्णय फेटाळलेला आहे. सदरील जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.

**प्रश्न क्रमांक ३६८:-**

महानगरपालिका अधिनियम ६३(११) अन्वये महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेत प्रेताची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी मोडत असल्याने महानगरपालिकेकडे स्मशानभुमीचे काही प्रमाणात व्यवस्थापन होते. काही ठिकाणी मसनजोगी (चौकीदार) आहेत. मुस्लीम कब्रस्तान व ख्रिश्चन

कब्रस्तानात प्रेत पुरल्यानंतर त्या प्रेताची अवहेलना होणार नाही या संदर्भात महानगरपालिकेची काय उपाययोजना आहे? जंगली श्वापद जसे उदबिल्ले प्रेत उकरून नेतात. अशा घटना होऊ नये म्हणुन महानगरपालिका चौकीदार ठेवणार आहे का?

**उत्तर:- उपआयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद.**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर चौकीदार व स्मशानजोगी यांची कमतरता असल्यामुळे प्रत्येक स्मशानभुमीत/कब्रस्तान मध्ये कर्मचारी देण्यात आलेले नाहीत. १५ स्मशानभूमि मध्ये स्मशानजोगी व एक कब्रस्तान मध्ये वॉचमन आहे.

**उत्तर:- आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद.**

मनपा औरंगाबाद क्षेत्रात मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कारासाठी विविध भागात एकुण ८२ स्मशान भुमि/कब्रस्तान असुन यात ३४ हिन्दु समाजासाठी स्मशान भुमी व मुस्लीम व ख्रिश्चन समाजासाठी ४८ कब्रस्तान आहेत.

यात प्रमुख्याने ३४ स्मशान भुमी या मनपा मालमत्ता विभाग मालमत्ता विभागा अंतर्गत असुन स्मशान भुमी देखभालासाठी यावर स्मशान जोगी कार्यरत आहेत.

तसेच मनपा अंतर्गत ४८ कब्रस्तान/ दफन भुमी हया खाजगी मालमत्ता असुन कब्रस्तानाच्या देखभालासाठी संबंधीत वक्फ बोर्डाने मनुष्यबळ उपलब्ध केलेले आहे. सदरील कर्मचाऱ्यांना मनपा तसेच वख्फ बोर्डातर्फे कुठलेच मानधन अथवा सेवा देण्यात येत नाही. सदरील कर्मचारी कब्रस्तानची देखभाल करुन उदरर्निवाह करीत आहेत. सदरील कर्मचाऱ्यांच्या विनंती वरुन कब्रस्तानातील मयत व्यक्तीच्या नोंदणीसाठी हिंदु स्मशानातील नोंदवही उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**प्रश्न क्रमांक ३६९:-**

महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७२ (क) (१) प्रमाणे महानगरपालिका प्रशासनाकडून कार्यालयीन कामकाजाबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते का? सदरची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर आहे ते ती करतात किंवा नाही? जर त्यांनी अंमलबजावणी केली नसल्याचे आढळून आल्यास महानगरपालिका प्रशासनाकडून अशा अधिकारी व कर्मचारी यांचेवर काय कार्यवाही करण्यात येते? व आतापर्यंत अशा प्रकारची अंमलबजावणी न करणाऱ्या किती अधिकारी व कर्मचारी यांच्यावर महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली? त्याचा तपशील देण्यात यावा.

**उत्तर:- उपआयुक्त (आस्था), महानगरपालिका औरंगाबाद.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२(क)(१) मध्ये प्रत्येक महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना नेमुन दिलेले काम शक्य तितक्या शिघ्रतेने पार पाडण्याबाबत तरतुद आहे. याबाबत महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना जाणीव असून ते त्यानुसार प्रशासकीय कामकाज करतात. तसेच एखाद्या अधिकारी/कर्मवाऱ्याने जाणुनबूजून किंवा हेतुपुरस्पर विलंब केला असल्यास त्याबाबतचा अहवाल संबंधित विभागप्रमुखांकडुन प्रशासनास प्राप्त झाल्यास सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. तथापि, या संदर्भात आजपर्यंत कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

**प्रश्न क्रमांक ३७०:-**

औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनीमार्फत समांतरचे ठेकेदार पाण्याच्या रक्कमेवर १८% विलंब शुल्क एसएमएस द्वारे नागरीकांना मागतात. अशा प्रकारे १८% विलंब शुल्क आकारणी करण्यास त्यांना कोणी प्राधिकृत केले? नागरीकांना शुध्द पाणी देण्याची संपुर्ण जबाबदारी महानगरपालिकेची असून ती मुलभुत अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने कायद्यानुसार पाणीपट्टीवर १८% विलंब शुल्क आकारणी करण्यात येते का? व ते कोणत्या तरतुदीनुसार.

इति.स.सा.सभा दिनांक २०-०२-२०१६
(कार्यक्रम प्रत्रिका क्रमांक-१४)

**<u>उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), महानगरपालिका औरंगाबाद.</u>**

औरंगाबाद महानगरपालिका पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी २०११ ला महाराष्ट्र शासनाने दिनांक ०६.०२.२०१४ रोजी मान्यता दिलेली असून दिनांक १४.०३.२०१४ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहे. सदर उपविधी औरंगाबाद महानगरपालिका व कन्सेशनर औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लिमीटेड यांचे दरम्यान झालेल्या कन्सेशन ॲग्रीमेंटचा भाग आहे. सदर उपविधी मधील कलम ७.१८ (iv) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार पाणीपट्टीच्या थकबाकीवर वार्षिक १८% दराने अधिभार (व्याज) लावणेबाबत तरतुद आहे. त्यानुसार कन्सेशनरमार्फत कार्यवाही सुरु आहे.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.